महाराष्ट्र विधानपरिषद

तिसरे अधिवेशन, २०१७

तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

बुधवार, दिनांक ०९ ऑगस्ट, २०१७ / श्रावण १८, १९३९ (शके)

(१) मुख्यमंत्री
(२) गृहनिर्माण मंत्री
(३) कामगार, कौशल्य विकास, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री
} **यांचे प्रभारी विभाग**

प्रश्नांची एकूण संख्या - ६९

कफ परेड येथील चिल्ड्रन पार्कची जागा संपादित केल्याबाबत

(१) * ३१५७४ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सीप्झ ते कुलाबा या मेट्रा-३ प्रकल्पाच्या मार्गातील ५००० झाडांची तोड व या प्रकल्पास पर्यावरण मंत्रालयाने दिलेला नकार तरीही सागरी हद्द नियंत्रण (सीआरझेड) क्षेत्रात मेट्रो प्रकल्प प्रशासनाने ९ स्थानके निश्चित केली असणे आणि त्यामध्ये कफ परेड येथील स्थानकासाठी "चिल्ड्रन पार्क" संपादित करण्यावरुन मा.उच्च न्यायालयाने दिनांक १२ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास एमएमआरडीए आणि मुंबई मेट्रो महामंडळाला सुधारित आराखडा प्रसिध्द करण्याचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सुधारित आराखडा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि मुंबई मेट्रो रेल महामंडळाने तयार करुन मा.उच्च न्यायालयास सादर केला आहे व त्याचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, सुधारित आराखडा तयार करण्यात आला नसल्यास "चिल्ड्रन पार्क" संपादित करण्याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) मुंबई उच्च न्यायालयाने याचिका क्र. ८१४/२०१७ मधील प्रकरणामध्ये दिनांक १२ एप्रिल, २०१७ च्या आदेशानुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनला कफ परेड भुयारी मेट्रो स्थानकाच्या जागेबाबत असलेला सुधारीत आराखडा सादर करण्याचे आदेश दिले होते.

(२) व (३) सुधारीत आराखड्याबाबत, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने व मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने उच्च न्यायालयामध्ये शपथ पत्र दाखल केलेले आहे. त्यानुसार, कफ परेड भूयारी मेट्रो स्थानकाचे संपुर्ण बांधकाम मुंबई शहराच्या विकास आराखड्यामध्ये दर्शविलेल्या ६०.९७ मी. रुंदीच्या प्रकाश पेठे मार्गाच्या हद्दीत असून विकास आराखड्यामध्ये दर्शविलेल्या चिल्ड्रन पार्कची जागा बाधित होत नाही. त्यामुळे मुंबई शहर विकास आराखड्यात दर्शविलेल्या कफ परेड येथील चिल्ड्रन पार्कची जागा संपादित करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

मुरूड (जि.रायगड) तालुक्यातील शासकीय आय.टी.आय. इमारतीकडे जाणारा पोहोच रस्त्याचे बांधकाम करण्याबाबत

(२) * ३२४५३ श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील : सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरूड (जि.रायगड) तालुक्यातील शासकीय आय.टी.आय. इमारतीचे बांधकाम काम पूर्ण झालेले असून सदर इमारतीकडे जाणारा पोहोच रस्ता बांधण्यात आला नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर रस्त्याचे बांधकाम न करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करून सदर रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर : (१) अंशत: खरे आहे.

औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुरुड या संस्थेच्या प्रशासकीय व कार्यशाळा इमारतीच्या बांधकाम निविदेमध्ये प्रश्नाधीन इमारतीकडे जाणारा पोहोच रस्ता बांधण्याची तरतूद समाविष्ट नाही.

(२) नाही.

औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुरुड या संस्थेच्या प्रशासकीय व कार्यशाळा इमारतीच्या बांधकाम निविदेमध्ये प्रश्नाधीन इमारतीकडे जाणारा पोहोच रस्ता बांधण्याची तरतूद समाविष्ट नसल्याने ठेकेदारावर कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्नाधीन कामाच्या अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने जिल्हा नियोजन समितीस सादर केला आहे. जिल्हा नियोजन समितीची मान्यता प्राप्त झाल्यानंतर याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मुंबई शहरातील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत

(३) * ३४०२२ श्री.जनार्दन चांदूरकर : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील गरीब झोपडपट्टीवासीयांना २६९ चौ.फुटा ऐवजी ३०५ चौ.फुटाचे घर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत देण्याचे दिनांक १८ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांनी जाहिर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासकीय अधिसूचना जारी न झाल्यामुळे मुंबईत झोपडपट्टी पुनर्विकासाचे प्रकल्प राबविणाऱ्या विकासकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुनर्वसनाच्या प्रतिक्षेत असलेले मुंबईतील लाखो झोपडपट्टीवासीय शासनाच्या अधिसूचनेची प्रतिक्षा करीत असल्याने सदर अधिसूचना केव्हा जारी करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता : (१) होय.

(२), (३), (४) व (५) मा. मुख्यमंत्री महोदयांच्या वरील घोषणेच्या अनुषंगाने मंजूर झालेल्या व चालू असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनांची व्यवहार्यता तपासून अभिप्राय व अहवाल देण्याचे निर्देश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाला देण्यात आलेले आहेत.

डहाणू (जि.पालघर) नगरपालिका परिसरातील सीआरझेड क्षेत्रात अनधिकृत बांधकाम केल्याबाबत

(४) * ३४३२७ श्री.आनंद ठाकूर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) नगरपालिका परिसरातील पारनाका दर्या किनाऱ्यालगत सीआरझेड क्षेत्रात तिर्थम आणि रॉयल या इमारतींचे अनधिकृतपणे बांधकाम करण्यात आल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या इमारतींच्या बांधकामास सीआरझेड व पर्यावरणाची परवानगी देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने याप्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) डहाणू नगरपरिषद हद्दीतील मौजे मसोली येथील गट क्र.९५ वर रॉयल गार्डन आणि गट क्र. ९८ व ९९ यावर तिर्थम या इमारती स्थित आहेत. सदर क्षेत्र सीआरझेड बाधित नाहीत.

यावरील बांधकामास नगरपरिषदेने बांधकाम परवानगी दिलेली आहे.

(३) पर्यावरण विभागाच्या अभिप्रायानुसार सीआरझेड अधिसूचना, १९९१ अंतर्गत मंजूर सीआरझेड नकाशानुसार मौजे मसोली, डहाणू येथील गट क्रमांक ९५, ९८ व ९९ हे सीआरझेड क्षेत्रात समाविष्ट नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

विलेपार्ले (पूर्व), मुंबई येथील मैदानाच्या आरक्षणाबाबत

(५) * ३०९६३ श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील विलेपार्ले (पूर्व) येथील सन १९९१ च्या विकास आराखडयातील भूखंड क्रमांक १८८, १८८ सी व १८८ डी हे भूखंड मनोरंजन मैदानासाठी आरक्षित असताना सुमारे २६ वर्षानंतर सदर भूखंडाचा प्रस्ताव निवासी वापरासाठी मुंबई महापालिकेच्या सुधार समितीत माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान चर्चेला आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भूखंडावर सध्या एस.आर.ए. चे काम सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले व तद्नुसार सदर भूखंड मनोरंजन मैदानासाठी पूर्ववत आरक्षित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) यासंदर्भात महापालिकेच्या सुधार समितीत चर्चा झालेली आहे.

(२) होय.

(३) व (४) प्रस्तुत प्रकरणी नगर रचना योजना क्र. ५, विलेपार्ले (प्रथम) (अंतिम) मधील भूखंड क्र. १८८, १८८ सी व १८८ डी हे मंजूर नगर रचना योजनेमध्ये कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनाने बाधित होत नव्हते. तसेच मंजूर विकास योजनेप्रमाणेही रहिवास विभागात अंतर्भूत असून कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी आरक्षित नाहीत. तथापि, रेखांकनातील त्रुटीमुळे महानगरपालिकेच्या प्रस्तावानुसार शासनाने दिनांक २१/७/२००८ रोजी निर्गमित केलेल्या अधिसूचनेन्वये नगर रचना योजनेमध्ये मंजूर केलेल्या बदलानुसार सदर भूखंड मनोरंजनासाठी आरक्षित झालेले होते. सदर त्रुटीची दुरुस्ती करण्यात आलेली असून शासनाकडील दिनांक ३० जानेवारी, २०१७ रोजीच्या नगर रचना योजनेमधील मंजूर बदलाच्या अधिसूचनेनुसार, सदर भूखंड रहिवास वापरामध्ये समाविष्ट करण्यात आलेले आहेत.

औरंगाबाद येथील कॅन्सर रुग्णालयास पाणीपुरवठा करणेबाबत

(६) * ३२१७५ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील कॅन्सर रुग्णालयाला प्रतिदिन १,५०,००० लिटर पाण्याची आवश्यकता असून महानगरपालिकेकडून फक्त १० ते १२ हजार लिटर पाणी पुरविले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबादने दिनांक १६ डिसेंबर, २०१४ रोजी महानगरपालिकेला आदेश देऊन त्वरित पाण्याची व्यवस्था करणेसाठी सूचना केल्या त्याप्रमाणे सदर रुग्णालयाने महानगरपालिकेला रुपये ४५ लक्ष दिले, परंतु अद्याप पाणीपुरवठयाची व्यवस्था झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कॅन्सर रुग्णालयाला पाणीपुरवठा करणेसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (२) व (३) औरंगाबाद महानगरपालिकेस सर्व पाणीपुरवठा योजनांद्वारे उपलब्ध होणारे पाणी परिमाण शहराच्या पाणीपुरवठ्याच्या मागणीच्या प्रमाणात कमी असल्याने उपलब्ध होणारे पाणी संपूर्ण शहरास दररोज पुरवठा करणे शक्य होत नाही.

मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांच्या निर्देशानुसार अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व कर्करोग रूग्णालय, औरंगाबाद यांनी पाणीपुरवठा करण्यासंदर्भात रुपये ४५,१६,६०५/- इतक्या रकमेचा धनादेश महानगरपालिकेकडे जमा केलेला आहे.

त्यानुसार कर्करोग रूग्णालय, औरंगाबाद यांना पाणीपुरवठा करण्यासाठी जुब्ली पार्क जलकुंभापासून २०० मी.मी. व १५० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकण्याचे काम डिपॉझीट वर्क अंतर्गत महानगरपालिकेमार्फत पूर्ण करण्यात आलेले आहे.

जलवाहिनी टाकण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर मार्च, २०१७ पासून कर्करोग रुग्णालयास तीन दिवसातून एकदा एक ते दीड तास पाणीपुरवठा करण्यात येत होता. आता दिनांक २२/७/२०१७ पासून पहिल्या दिवशी

साधारणत: १.२५ लक्ष लीटर, दुसऱ्या दिवशी साधारणत: ७०,००० लीटर आणि तिसऱ्या दिवशी निरंक अशा रोटेशन प्रमाणे रूग्णालयास महानगरपालिकेकडून पाणीपुरवठा सुरू केलेला आहे.

औरंगाबाद शहराकरीता समांतर पाणीपुरवठा योजना होऊन पाणी परिमाण वाढल्यानंतर रूग्णालयाच्या मागणीप्रमाणे पाणीपुरवठा करणे शक्य होईल असे औरंगाबाद महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई शहर आणि उपनगरात नियमबाह्य बांधकाम केलेल्या विकासकांवर कारवाई करण्याबाबत

(७) * ३१६५९ श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.राहुल नार्वेकर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर आणि उपनगरात पूर्ण झालेल्या इमारती व बांधकाम होत असलेल्या इमारतीमध्ये विकासकांकडुन ओ.सी. (ऑक्युपेशन सर्टिफिकेट) महानगरपालिकेकडून घेतल्यानंतर बी.सी.सी. (Building Complition Certificate) लवकर घेत नाहीत व दरम्यानच्या काळात अधिकचा प्रोत्साहानात्मक एफ.एस.आय. व राखीव एफ.एस.आय. मिळाल्याचे भासवून विकासकांकडून अग्निशमन उद्देशाकरिता (रिफ्युज एरिया) व पार्किंगसाठी राखीव मजल्यांवर सदनिका व व्यावसायिक गाळ्यांचे बांधकाम केले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा इमारतीत घर घेतलेल्या आणि घेणाऱ्या लोकांची फसवणुक होत असून यासंदर्भातील तक्रारी सातत्याने वाढत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकारे पुनर्विकास नियमांचे उल्लंघन करुन झालेल्या व होत असलेल्या बांधकामांबाबत शासनाचे धोरण काय आहे,

(४) तसेच, ओ.सी. (ऑक्युपेशन सर्टिफिकेट) आणि बी.सी.सी. (Building Complition Certificate) घेण्याबाबत निश्चित कालावधी ठरविण्याबाबत तसेच नियमबाहय बांधकाम केलेल्या विकासकांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे प्राप्त होणाऱ्या पुनर्विकास प्रस्तावांना आय.ओ.डी. तसेच सुधारित नकाशांच्या मान्यता पत्रातील अटी व शर्तींच्या पूर्ततेनंतर भोगवटा प्रमाणपत्र (ओ.सी.) प्रदान करण्यात येते.

विकासकास अधिकचे चटईक्षेत्र (एफएसआय) अनुज्ञेय झाल्यास विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदींप्रमाणे वाढीव चटईक्षेत्रातील बांधकामाबाबतचे नकाशे मंजूर करण्यात येतात.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रचलित धोरणानुसार अतिरिक्त अथवा शिल्लक असलेल्या चटईक्षेत्राच्या आधारे पूर्वी मंजूर केलेल्या नकाशाव्यतिरिक्त केलेल्या अधिकच्या बांधकामाचे दंड आकारुन नियमितीकरण (Regularization) करणे शक्य असते.

विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदींनुसार अग्निशमन उद्देशाचे तसेच पार्कींगसाठी आवश्यक असलेले क्षेत्रफळ हे एफ.एस.आय.मध्ये गणण्यात येत नाही. अशा क्षेत्रफळावर रहिवासास योग्य (Habitable) असे बांधकाम करणे अपेक्षित नसते. तथापि, असे आढळल्यास त्यावर महानगरपालिकेच्या संबंधित विभागामार्फत कारवाई करण्यात येते.

(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या इमारत प्रस्ताव विभागाने मंजूर केलेल्या नकाशाव्यतिरिक्त काम केल्याचे आढळल्यास संबंधित विभागामार्फत अतिरिक्त बांधकामावर निष्कासनाची कारवाई करण्यात येते.

(४) विकासकाने वास्तुविशारदांमार्फत भोगवटा प्रमाणपत्र (ओ.सी.) व इमारत पुर्णत्वाचे प्रमाणपत्र (बी.सी.सी.) सादर केल्यानंतर इज ऑफ डुईंग बिझनेस नुसार भोगवटा प्रमाणपत्र व इमारत पुर्णत्वाचे प्रमाणपत्राच्या परवानग्या एकत्रितरीत्या देण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महापालिकेच्या पर्जन्य व मलनि:स्सारण विभागातील कंत्राटी कामगारांच्या वेतनाबाबत

(८) * ३३७४२ श्री.रामहरी रुपनवर, श्री.जनार्दन चांदूरकर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या पर्जन्य व मलनि:स्सारण विभागातील ६० पैकी २० कंत्राटी कामगारांना काम नाकारल्याचा निषेध करत या कामगारांनी मलनि:स्सारण विभागाच्या गाडया दादर येथील कार्यालयासमोर अडविल्याचे दिनांक १८ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कामगारांना सध्या ८ ते ८.५ हजार रुपये वेतन मिळत असून किमान वेतन लागू झाल्यास १३.५ ते १५ हजार रुपये वेतन मिळू शकेल, या प्रत्येक कामगाराची थकबाकी १ लाख ३४ हजार रुपये महापालिकेकडे थकीत असून यामध्ये १७ ते २० वर्षांपासून कामावर असलेल्यांचाही समावेश असल्याने सदरहू कंत्राटी कामगारांना योग्य वेतन मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पर्जन्य जलवाहिनी विभागातील ५९ कंत्राटी कामगारांपैकी काही कंत्राटी कामगारांनी पर्जन्य जलवाहिनी विभागाच्या काही गाडया दादर येथील कार्यालयासमोर दिनांक १७/०४/२०१७ रोजी अडविल्या ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) कंत्राटदारांकडे काम करणाऱ्या ५९ कामगारांना माहे जुलै, २०१५ पूर्वी रुपये २८८/- प्रतिदिन प्रति कामगार इतके किमान वेतन देण्यात येत होते.

तथापि, माहे जुलै, २०१५ मध्ये सदर कामगारांच्या वेतनात वाढ होऊन रुपये २९३.८३ प्रतिदिन प्रति कामगार इतके किमान वेतन कंत्राटदारामार्फत त्यांना देण्यात येत होते.

सदर ५९ कामगारांपैकी ३५ कामगारांच्या वैयक्तिक बँक खात्यामध्ये फेब्रुवारी, २०१५ ते डिसेंबर, २०१५ मधील वेतनातील फरकाची रुपये २,२५,५७०/- इतकी रक्कम कंत्राटदारांमार्फत जमा करण्यात आली आहे. उर्वरित २४ कामगारांपैकी ११ कामगारांना कंत्राटदारामार्फत सुधारीत वेतनवाढीनुसार वेतन देण्यात येत होते व १३ कामगार संबंधित कंत्राटदारांकडे कार्यरत नसल्यामुळे त्यांना वेतनामधील फरकाची रक्कम देण्यात आली नाही.

जानेवारी, २०१६ पासून सदर कामगारांना रुपये ५४४.६१ प्रतिदिन प्रति कामगार इतके किमान वेतन देण्याची मागणी सदर कामगारांनी सहाय्यक कामगार आयुक्त यांच्याकडे केली आहे.

सदर कामगारांना कंत्राटदारामार्फत वेतन अदा करण्यात येते. तथापि, सदर कामगारांच्या वेतनाच्या रकमेतील तफावत महानगरपालिकेमार्फत देण्यात यावी अशी मागणी कंत्राटदारांनी महानगरपालिकेकडे केलेली आहे. सदर प्रकरणी सहाय्यक कामगार आयुक्त, मुंबई यांच्याकडे सुनावणी सुरु आहे.

किमान वेतन अधिनियमातील तरतुदीनुसार सदर कंत्राटी कामगारांना माहे एप्रिल, २०१७ पासून प्रतिदिन रुपये ५५०/- इतके वेतन देण्यात येत असून, ते कामगारांच्या वैयक्तिक बँक खात्यात जमा केल्याची खातरजमा महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

अंधेरी (मुंबई) येथील शाळेत एका अल्पवयीन मुलीचे लैंगिक शोषण केल्याबाबत

(९) * ३२८३७ श्री.प्रविण दरेकर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी (मुंबई) येथील एका नामांकित शाळेमध्ये शिकत असलेल्या अवघ्या साडेतीन वर्षाच्या मुलीचे लैंगिक शोषण केल्याप्रकरणी एम.आय.डी.सी. पोलिसांनी शाळेच्या विश्वस्तांसह शिक्षिकेविरोधात माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान गुन्हा दाखल केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार दोषी व्यक्तीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.

माहे मे मध्ये गुन्हा दाखल आहे.

(२) एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे येथे गुरक्र २११/१७ कलम ३७६ (२) (आय) भादंविससह लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ कलम ४, ६, १० अन्वये गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

पंढरपूर नगरपालिका हद्दीतील गटारे बंदिस्त करणेबाबत

(१०) * ३४२८४ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे : तारांकित प्रश्न क्रमांक २९७५० ला दिनांक १५ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:

सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर नगरपालिका हद्दीतील इसबावी गट नं. ११७ व ११८ येथे गटारी व ड्रेनेज बांधणेबाबत निविदा मंजूर केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपालिकेने निविदा मंजूर करून सुद्धा ते काम अपुर्ण ठेवले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर भागातील मैलामिश्रित पाणी उघड्यावर सोडले जात असल्यामुळे हा परिसर दुर्गंधीयुक्त झाला असून त्यामुळे स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधी यांनी मुख्याधिकारी, पंढरपूर नगरपालिका यांच्याकडे अर्ज विनंत्या केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) इसबावी साबळेनगर ते इसबावी गावापर्यंत व गावठाण ते अक्षत बंगलोज या भागात भुयारी गटार या स्वनिधितील कामाची निविदा पंढरपूर नगरपरिषदेने मंजूर केली आहे, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

- गट नं.११७ व ११८ मधील भुयारी गटाराचे काम पूर्ण झाले आहे.
- गट नं.११७ व ११८ लगतच्या गट नंबर मधील भुधारकांनी कामामध्ये अडथळा आणलेने सदर काम अपूर्ण होते.
- याबाबत जिल्हाधिकारी यांच्यावतीने जिल्हा प्रशासन अधिकारी व मुख्याधिकारी यांनी सर्व संबंधितांची बैठक घेऊन जमीनधारकांशी चर्चा केली.
- चर्चेनुसार जमीनमालकांना आर्थिक मोबदला दिला असल्याने ८०० मीटरचे काम पूर्ण करण्यात आले असून उर्वरित ६०० मिटरचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) स्थानिक नागरिक, लोकप्रतिनिधी यांनी मुख्याधिकारी, पंढरपुर नगरपरिषद यांचेकडे तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे.

(४) व (५) इसबावी गट नं. १२० मध्ये सांडपाणी खड्डयात एकत्र करुन सक्शन मशीनव्दारे इसबावी मलपे नाला येथील भुयारी गटारातील पंपगृहात सोडले जात असून सदर परिसर दुर्गंधीयुक्त होणार नाही, याची दक्षता पंढरपूर नगरपरिषदेमार्फत घेण्यात येत आहे.

ग्रँटरोड (मुंबई) येथील ब्राम्हणवाडीतील चाळमालकावर कारवाई करणेबाबत

(११) * ३११५४ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती हुस्नबानू खलिफे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रँटरोड (मुंबई) येथील ब्राम्हणवाडीतील रहिवाशांना त्यांचे घरमालक दामजी आणि धिरेंद्र शहा हे दहशत निर्माण करुन त्यांना घरातुन हुसकावुन लावण्यासाठी अनेक गुन्हे करतात त्याविरुध्द अनेकांनी तक्रारी करुनही पोलिसांनी कोणतीही कायदेशीर कारवाई केली नाही याकरिता दिनांक १५ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास पोलीस आयुक्त, मुंबई यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवेदनातील तक्रारीचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.
(२) व (३) सदरहू निवेदनात ब्राम्हणवाडी भाडेकरु संघाने चाळमालकाविरुद्ध तक्रारी केल्या असून ह्या तक्रारी १९८९ ते २०१५ या कालावधीतील आहेत. सदर तक्रारीच्या स्वरुपानुसार पोलिसांकडून वेळोवेळी गुन्हयांची नोंद करण्यात आली असून, या प्रकरणी कायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे. ब्राम्हणवाडीत गेल्या दोन वर्षात कोणताही वाद निर्माण झालेला नाही .
(४) प्रश्न उद्भवत नाही.

भंडारा जिल्हयात मायक्रो फायनान्स कंपनीने नागरिकांची फसवणूक केल्याबाबत

(१२) * ३४०२९ श्री.परिणय फुके : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्हयात मायक्रो फायनान्स कंपन्याकडून जास्त व्याज दर लावून सर्वसामान्य नागरिकांची फसवणूक होत असल्याचे दिनांक २ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कंपनीने राज्यातील ग्रामीण भागातील महिलांची आर्थिक फसवणूक करुन जबरदस्तीने कर्जाचे हप्ते वसूली केल्याने कंपनीच्या विरोधात महिला कर्जमुक्ती आंदोलन समितीने स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे उपस्थितीत मा.मुख्यमंत्री महोदयांना माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान कंपनी विरोधात निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर कंपनीच्या संचालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (२) व (३) महिला कर्जमुक्ती आंदोलन समितीने दिनांक १७/०१/२०१७ रोजी निवेदन शासनास सादर केले आहे. भंडारा जिल्ह्यामधील मायक्रोफायनान्स कंपन्यांसंदर्भात ४ तक्रारी अर्ज प्राप्त झालेले आहेत. सदरहू तक्रार अर्जामधील वेळेत कर्ज परतफेड न झाल्याने कंपनीचे अधिकारी धमकी देऊन अपमान करत असल्याच्या आशयाच्या तक्रारी आहेत. याप्रकरणी जबाब नोंदविण्यात आले असून जबाबामध्ये कंपनीकडून कोणत्याही प्रकारची फसवणूक झाली नसल्याचे नमूद केले आहे. तथापि, ज्या प्रकरणी जबाबामध्ये कंपनीचे एजंट हे कर्ज परतफेडीकरीता तगादा लावत असल्याचे सांगितले आहे अशा प्रकरणी मायक्रोफायनान्स कंपनीच्या संबंधित एजंट विरुध्द फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १४९ प्रमाणे नोटीस बजावण्यात आली आहे.

गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक लवेसु-१२१६/प्र.क्र.४/शिकाना/पोल-१३, दिनांक १२/०४/२०१७ अन्वये राज्यातील मायक्रोफायनान्स कंपन्यांनी महिला व पुरूषांना विनातारण दिलेल्या कर्ज प्रकरणांची चौकशी करण्यासाठी विभागीय आयुक्त, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली प्रशासकीय समिती स्थापित करण्यात आली असून सदर समितीमार्फत चौकशीची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच सदर प्रकरणी राज्यातील काही लघु वित्तीय संस्था लोकांना दिलेले कर्ज वसुली करताना लोकांना धाकदपटशा करणे, धमक्या देणे, दिलेले कर्ज जबरदस्ती वसुल करणे (Coercive methods) असे प्रकार करत असतील तर अशा लघु वित्तीय संस्थाविरूद्ध कायदेशीर कारवाई करणेबाबत सर्व विभागीय आयुक्त आणि पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना शासनाचे दिनांक १३ एप्रिल, २०१७ चे पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कांदिवली (पश्चिम), मुंबई येथील मंडईच्या दुरवस्थेबाबत

(१३) * ३१५१२ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांदिवली (पश्चिम), मुंबई येथील महावीर नगर येथे महानगरपालिकेमार्फत उभारण्यात आलेल्या मंडईची दुरवस्था झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मंडईच्या संरक्षण भिंतीवरील लोखंडी जाळ्या व इतर अल्युमिनियमचे साहित्य चोरीला गेले असून त्याठिकाणी परिसरातील इतर सोसायटयांना देखील या चोरट्यांचा खूप त्रास सहन करावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रात्रीच्या वेळेस सदर मंडईमध्ये काही युवक अंधारामध्ये दारू पिण्याचे कृत्य करत असून रात्री उशिरापर्यंत थांबून काही असामाजिक कृत्य करीत असल्याचे निदर्शनास आले असून याठिकाणी कपोल विद्यानिधी शाळेशेजारी काही निर्वासित लोक झोपड्या बांधून उघड्यावर राहत असून सदर लोक त्याच ठिकाणी जेवण, शौचालयाची कामे करीत असल्यामुळे तेथील नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशा प्रकारे महानगरपालिकेमार्फत बांधण्यात आलेल्या मंडईचा दुरुपयोग होत असून शासन महानगरपालिकेला याठिकाणी होत असलेले कृत्य थांबविण्याकरिता निर्देश देणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) महावीर नगर, कांदिवली (पश्चिम) येथील मंडई वापरात नसल्यामुळे सदर ठिकाणी अज्ञात समाजकंटकांमार्फत चोरी व तोडफोड इ. मुळे मंडईची दुरवस्था झाली आहे ही वस्तुस्थिती आहे.

(३), (४) व (५) सदर मंडईत २५ प्रकल्पबाधित व्यक्तींनी त्यांना देण्यात आलेल्या गाळयाचा ताबा न घेतल्यामुळे मंडईचा वापर होत नाही. त्यामुळे सदर मंडईची दुरवस्था झाली आहे.

सदर प्रकल्पबाधित व्यक्तींचे वाटपपत्र रद्द करण्यात आले असून, तानसा प्रकल्पबाधित व्यक्तींना दिनांक २४/०३/२०१७ वाटपपत्र देण्यात आले आहे.

सद्य:स्थितीत सदर मंडई रिकामी असून, महानगरपालिकेमार्फत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे :-

- सदर ठिकाणी चोरी, दारु पिऊन दुष्कृत्य करणे याकरिता अज्ञातांविरोधात स्थानिक पोलीस स्टेशनला दिनांक १३/०५/२०१६, ३१/०५/२०१७ व १४/०६/२०१७ रोजी तक्रारी करण्यात आल्या आहेत.
- सदर ठिकाणी पूर्ण वेळ सुरक्षा रक्षकासाठी निविदा मागविण्याची कार्यवाही सुरु आहे.
- त्यादरम्यान विभागस्तरावर महानगरपालिकेच्या सुरक्षा रक्षकाची नियुक्ती करण्यात येत आहे.
- सदर मंडईच्या जवळील कपोल विद्यानिधी शाळेशेजारील झोपडया दिनांक ०३/०६/२०१७ रोजी निष्कासित करण्यात आल्या आहेत.
- सदर मंडईच्या ठिकाणी कांदिवली पोलीस ठाणे यांचेमार्फत बीट अधिकारी, बीट अंमलदार, बीट मार्शल, बिनतारी संदेश वाहने व दिवसपाळी/रात्रपाळी कर्तव्य निरीक्षक यांची सतत गस्त ठेवण्यात आली असून, सदर ठिकाणी कोणीही असामाजिक कृत्य करीत असल्याचे पोलिसांना आढळून आले नाही.

मुंबई व ठाण्याला जोडणाऱ्या मेट्रो-४ प्रकल्पाच्या बांधकामाबाबत

(१४) * ३३४९९ ॲड.अनिल परब : तारांकित प्रश्न क्रमांक २७६८३ ला दिनांक २९ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडाळा - घाटकोपर - मुलुंड - तीन हात नाका - कासारवडवली या मुंबई व ठाण्याला जोडणाऱ्या मेट्रोमार्ग-४ च्या बांधकामास ठाण्यामध्ये सुरुवात झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामास केंव्हा सुरुवात होऊन ते किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.
(२) व (३) सदर प्रकल्पाच्या कामास माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये सुरुवात होणार असुन सदर काम माहे डिसेंबर, २०२१ मध्ये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट गावांची पाणीपुरवठा समस्या सोडविण्याबाबत

(१५) * ३२५७७ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या २७ गावांमध्ये पाणीपुरवठा समस्या तीव्र बनली असून याबाबत येथील नागरिकांनी अनेकदा तक्रारी, पत्रव्यवहार करुनही महानगरपालिका प्रशासन दुर्लक्ष करीत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे संतापलेल्या नागरिकांनी महानगरपालिका मुख्यालयावर माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान हंडा मोर्चा काढला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील २७ गावांची पाणीपुरवठा समस्या कायमची निकाली काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत समाविष्ट २७ गावांच्या नागरिकरणामुळे झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येस पाणीपुरवठा अपुरा पडत आहे, ही वस्तुस्थिती आहे. तथापि, नागरिकांच्या तक्रारीवर महानगरपालिका प्रशासनामार्फत वेळोवेळी कार्यवाही करण्यात येते.
(२) हे खरे आहे.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात नव्याने समाविष्ट झालेल्या २७ गावांच्या काही भागातील नागरिकांनी अपुरा पाणीपुरवठा होत असल्याने, माहे मार्च, २०१७ रोजी हंडा मोर्चा काढला होता.

(३) मा.मंत्री, जलसंपदा यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २ मे, २०१७ रोजी झालेल्या बैठकीत माहे जुलै, २०१७ पर्यंत उक्त २७ गावांकरीता अतिरिक्त २५ द.ल.लि. पाणीपुरवठा देण्याबाबत पाटबंधारे विभागास निर्देश देण्यात आले. त्यानुसार पाणीपुरवठा करण्यात आला आहे.

केंद्र व राज्य शासनाच्या अमृत अभियानांतर्गत कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमध्ये समाविष्ट झालेल्या २७ गावांकरीता पाणीपुरवठा योजना सन २०१७-१८ या वित्तीय वर्षामध्ये हाती घेण्यात आली असून ती मंजूरीच्या कार्यवाहीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक शहरातील वाहतुक आराखडयाबाबत

(१६) * ३१७९१ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २७९८३ ला दिनांक १५ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहर वाहतुक विषयक सर्वंकष अभ्यास करून मेट्रोसंदर्भातील प्रस्ताव सादर करणेबाबत शासनाने नाशिक महानगरपालिकेस दिलेल्या निर्देशानुसार महानगरपालिकेने शहर वाहतुक आराखडा तयार करण्यासाठी मेसर्स अर्बन मास्क ट्रान्झीट कंपनी लि. या सल्लागाराची नेमणुक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकास्तरावरील वाहतुक आराखडा तयार करण्याचे सुरु असलेले काम पुर्ण झाले आहे काय,

(३) असल्यास, उक्त आराखड्याचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे व सदरील वाहतुक आराखडा महानगरपालिकेने मंजूरी व पुढील निर्णयास्तव शासनास सादर केला आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.

(२), (३) व (४) नाशिक महानगरपालिकास्तरावर वाहतुक आराखडा तयार करण्याचे सुरु असलेले काम अंतिम टप्प्यात आहे.

मौजे कांदिवली (ता.बोरिवली) मुंबई येथील झोपडपट्टीवासियांच्या पुनर्वसनाबाबत

(१७) * ३३४५३ श्री.हरिसिंग राठोड, ॲड.अनिल परब : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कांदिवली (ता.बोरिवली) मुंबई उपनगर (पश्चिम) येथील नगरभूमापन क्र.१२८ अ/३६६-अ-३ या रेव फादर जोसेफ व पी.परेश व इतर यांच्या मालकी असलेल्या जमिनीवर ५० पात्र झोपडीधारकांना मे.कॉनवून एजन्सीचे मुखत्यार व विकासक यांच्यातर्फे माहे मार्च, २०१० मध्ये वा त्यादरम्यान झोपडीधारकांना पत्रके देऊन झोपडपट्टी योजना राबविण्यासाठी जागा ताब्यात घेण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू झोपडीधारकांच्या पुनर्वसनासाठी मे.कॉनवून एजन्सीचे मुखत्यार व विकासक यांच्यातर्फे शासनाला प्रस्ताव सादर करुन त्यास नियमानुसार मंजूरी दिली आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, त्याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता : (१), (२) व (३) उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) व सक्षम प्राधिकारी, बोरिवली यांच्या कार्यालयीन अभिलेखानुसार मौजे कांदिवली येथील न.भू. क्र.१२८ अ/६६(पै), १२८/अ/६६/१ ते १२, १२८/७०(पै), १२८अ/७२(पै), ७ अ (पै), ७ब (पै), ७ क(पै) एकूण ६००० चौ.मी. क्षेत्र गलिच्छ वस्ती म्हणून दिनांक १८/३/१९९८ व ४/३/१९९९ रोजी घोषित झाल्याचे दिसते. तसेच सदर जागेवर कोणतीही झोपडपट्टी पुनर्वसन योजना दाखल अथवा मंजूर करण्यात आली नसल्याचा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे महानगरपालिकेने काळया यादीत समाविष्ट असलेल्या कंपनीस कंत्राट दिल्याबाबत

(१८) * ३०९८४ ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक २७७४१ ला दिनांक १५ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेमार्फत आर ॲण्ड बी सन्स इन्फ्रास्ट्रक्चर या कंत्राटदार कंपनीस शहरातील माजिवाडा जंक्शन, पोखरण रोड क्र.२, वसंत विहार, कोपरी प्रभाग इत्यादी ५ ठिकाणच्या कामाचे कंत्राट देण्यात आले तसेच सदर कामांकरिता प्रसिध्द केलेल्या निविदांमध्ये काळया यादीत समाविष्ट असलेल्या कंत्राटदार कंपनीला निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होता येणार नाही अशी अट घालण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आर ॲण्ड बी सन्स इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीस मुंबई व ठाणे महानगरपालिकेने काळया यादीत टाकले असताना ठाणे महानगरपालिकेने काळया यादीतील या कंत्राटदार कंपनीस सदर कामांचे कंत्राट देण्यात आल्याचे दिनांक २८ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी सखोल चौकशी करण्याच्या सूचना ठाणे महानगरपालिका आयुक्ताना देण्यात आल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील ५ ठिकाणाची कामे आर ॲण्ड बी सन्स इन्फ्रास्ट्रक्चर या कंत्राटदार कंपनीस नव्हे तर, आर ॲण्ड बी इन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि.या कंपनीस देण्यात आल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

सदर कामांकरीता प्रसिध्द केलेल्या निविदांमध्ये काळ्या यादीत समाविष्ट असलेल्या कंत्राटदार कंपनीला निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होता येणार नाही अशी अट घालण्यात आली नसल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी उक्त कंत्राटदारास ठाणे महानगरपालिकेच्या क्षेत्रात कामांचे कंत्राट का देण्यात आले तसेच इतर महानगरपालिकांनी deregister केलेल्या कंत्राटदार कंपन्यांना ठाणे महानगरपालिका क्षेत्रात काम न देण्याची अट का अंतर्भूत करण्यात आली नाही याबाबत सखोल चौकशी करण्याच्या सूचना आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना यापूर्वीच दिनांक १४/०३/२०१७ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आल्या आहेत.

सदर चौकशी अंतिम होईपर्यंत सदर ठेकेदार कंपनीला पुढील कामांचे कार्यादेश देण्यात येणार नाहीत असे आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद रेल्वे स्टेशन रोडवरील महानगरपालिकेची इमारत खाजगी व्यावसायिकास डायग्नोस्टिक सेंटर उभारण्यासाठी दिल्याबाबत

(१९) * ३४३४० श्री.सुभाष झांबड : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद रेल्वे स्टेशन रोडवर महानगरपालिकेने एका खाजगी व्यावसायिकास माफक दरात डायग्नोस्टिक सेंटर उभारण्यासाठी पाच वर्षापूर्वी भाडे तत्वावर इमारत दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या इमारतीला अत्यंत कमी भाडे लावण्यात आल्याचे मत तत्कालीन आयुक्तांनी नोंदवून रेडीरेकनर नुसार सदर व्यावसायिकाकडून मागील पाच वर्षाचे सुमारे रुपये १६ कोटी वसूल करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) औरंगाबाद महानगरपालिकेच्या विशाल मार्केट, रेल्वे स्टेशन, औरंगाबाद येथील जागा BOT तत्वावर मे.जीवनबाई तापडीया चॅरीटेबल ट्रस्ट यांना सात वर्षाच्या कालावधीकरीता डायग्नोस्टिक सेंटर चालविण्यासाठी महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या मान्यतेने तसेच विहीत अटी व शर्तीनुसार भाडे तत्वावर देण्यात आलेली होती.

(२) व (३) हे खरे नाही.

असे कोणतेही आदेश तत्कालीन आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांनी दिलेले नाहीत.

या प्रकरणी करारनामा संपुष्टात आल्याने करारनामा नुतनीकरण करण्याचा प्रस्ताव महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या पुढे ठेवण्यात येत असून, या प्रस्तावात रेडीरेकनर दराने संबंधिताकडून भाडे व १२% रॉयल्टी भरून घेण्याबाबत प्रस्तावित करण्यात आलेले असल्याचे औरंगाबाद महानगरपालिकेने कळविलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे जिल्ह्यातील पोलीस वसाहतींची दुरवस्था झाल्याबाबत

(२०) * ३२३५९ श्री.अनिल भोसले : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवाजीनगर, भवानी पेठ, खडक, औंधमधील बॉडीगेट (जि.पुणे) येथील पोलीस वसाहतींना १०० वर्षे पूर्ण होऊन या वसाहतींची दुरवस्था झाल्याचे व येथील पोलिसांच्या घराच्या मागणीची प्रतिक्षा यादी हजाराच्यावर गेल्याने पोलिसांना घरे मिळत नसल्याची बाब माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार जिल्ह्यातील पोलीस वसाहतींची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत व पोलिसांना घरे उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) शिवाजीनगर पोलीस वसाहतीमधील बैठ्या चाळीतील निवासस्थाने १०० वर्षावरील झाली असल्याने राहण्यालायक नसल्याने सदरची बैठी चाळ रिक्त करुन घेण्यात येत आहे. उर्वरीत भवानी पेठ, खडक, औंधमधील बॉडीगेट वसाहतीमधील निवासस्थाने राहण्यायोग्य असून सदर ठिकाणी पोलीस कर्मचारी राहत आहेत. तसेच माहे मे, २०१७ अखेर एकूण १६७६ पोलीस कर्मचारी निवासस्थानासाठी प्रतिक्षेत आहेत.

(२) शासन ज्ञापन क्र. दुरुस्ती०११७/प्र.क्र.८५/पोल-७, दिनांक ०१ जुलै, २०१७ अन्वये पुणे पोलीस आयुक्त यांच्या अधिकार क्षेत्रातील निवासी व कार्यालयीन इमारती यांची दुरुस्ती करण्यास रुपये ६,२०,५१,८७६/- इतक्या खर्चाच्या अंदाजास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळामार्फत औंध बॉडीगेट, भवानी पेठ, येथील निवासस्थानांचा प्रस्ताव नियोजन स्तरावर असून प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नेमणूक करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

बीड नगरपरिषदेच्या लेखा विभागात गैरव्यवहार झाल्याबाबत

(२१) * ३३२२४ श्री.विनायकराव मेटे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड नगरपरिषदेच्या लेखा विभागात कोट्यवधी रूपयांचा गैरव्यवहार होत असल्याबाबतची लेखी तक्रार जिल्हाधिकारी, बीड यांचेकडे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी, बीड यांनी या प्रकरणाची दखल घेतली आहे काय, तद्नुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) या आशयाचे निवेदन जिल्हाधिकारी, बीड यांचेकडे प्राप्त झाले आहे.

(२) उक्त निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, बीड यांना चौकशी करण्याच्या सूचना शासनपत्र दिनांक २ ऑगस्ट, २०१७ अन्वये दिल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

कोथळीचा (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथील राष्ट्रीय बालशौर्य पुरस्कार प्राप्त बालक बेपत्ता झाल्याबाबत

(२२) * ३१४९७ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोथळीचा (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथील राष्ट्रीय बालशौर्य पुरस्कार प्राप्त निलेश रेवाराम भिल हा १२ वर्षीय बालक माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान बेपत्ता झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बालकाचे अपहरण झाल्याचा संशय त्याच्या नातेवाईकांकडून व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दोन महिने उलटूनही सदर बालकाचा अद्याप शोध लागलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राष्ट्रीय बालशौर्य पुरस्कार प्राप्त बालकाच्या तपासासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी मुक्ताईनगर पोलीस स्टेशन, भाग-५ येथे गु.र.नं. ८६/२०१७ भा.दं.वि. कलम ३६३ नुसार अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर बालकाचा शोध घेणेकामी ६ तपास पथके नेमली असून, महाराष्ट्रातील संभाव्य शहर व ठिकाणी तसेच, मध्यप्रदेश राज्यात तपासाकरिता पाठवून शोधकार्य करण्यात आले आहे.

लोहमार्ग पोलिसांना याबाबत माहिती देवून जळगाव भुसावळ रेल्वे स्थानकातील सी.सी.टि.व्ही. फुटेज माध्यमातून माहिती संकलीत करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्दी करुन शोधकाम केले आहे. ट्रॅक द मिसींग चाईल्ड या वेबसाईटवर हरविलेल्या बालकांची माहिती अपलोड करण्यात आली आहे.

शिवाय आकाशवाणी केंद्र व दुरदर्शन केंद्र, जळगाव यांना सदर बालकाबाबतची माहिती प्रसारीत करण्यासंदर्भात विनंती करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस अधिक्षक, जळगाव यांच्या देखरेखीखाली सुरु आहे.

(५) विलंब झालेला नाही.

संघर्ष नगर-चांदिवली, अंधेरी (मुंबई) येथे शापुरजी पालनजी कंपनीने जमिनीमध्ये सुरुंग लावल्याबाबत

(२३) * ३४००७ प्रा.जोगेन्द्र कवाडे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संघर्षनगर-चांदिवली, अंधेरी (मुंबई) येथे शापुरजी पालनजी कंपनीने भर पावसाळ्यात जमिनीमध्ये सुरुंग लावून जवळपास ८० ते १०० फूट खोल खोदकाम केल्याने जमीन खचून रस्त्यात मोठा खड्डा पडल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कंपनीच्या बेजबाबदारपणामुळे संघर्षनगर पुनर्वसन प्रकल्पाच्या एसआरएच्या इमारतींना धोका निर्माण झाला असून माळीणची पुनरावृत्ती होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कंपनीच्या व्यवस्थापनाविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उक्त ठिकाणी सुरु असलेले काम त्वरीत बंद करुन या विकासकाला काळ्या यादीत टाकण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) संघर्ष नगर-चांदिवली, कुर्ला (पश्चिम) शापुरजी पालनजी कंपनीने ३३ फुट खोल खोदकाम केले होते व पर्जन्य जलवाहिनी फुटून पावसाच्या पाण्याच्या मोठया प्रवाहामुळे सदर रस्ता दिनांक २६ जून, २०१७ रोजी खचला होता ही वस्तुस्थिती आहे.

(२) सदर रस्त्याच्या बाजूकडील एस.आर.ए. इमारत क्र. ९ ला धोका नसल्याचे आय.आय.टी, मुंबई यांनी दिनांक ०७/०७/२०१७ रोजीच्या पत्रान्वये महानगरपालिकेस कळविले आहे.

(३) व (४) सदर कंपनीच्या व्यवस्थापनाविरुध्द महानगरपालिकेमार्फत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे :-

- सदर कंपनीच्या विकासकास दिनांक २७/०६/२०१७ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.
- विकासकास खड्डा पडलेल्या ठिकाणी व्यवस्थित भरणी करुन रस्ता पूर्ववत करण्याचे आदेश दिनांक २७/०६/२०१७ रोजी देण्यात आले आहेत.
- सुरक्षिततेच्यादृष्टीने २४ तास दक्षता घेण्यासाठी मनुष्यबळ व तांत्रिक उपाययोजना करण्याबाबत विकासकास कळविण्यात आले आहे.
- मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५४-अ अन्वये इमारतीचे काम थांबविण्याबाबत दिनांक २७/०६/२०१७ रोजी नोटीस बजावण्यात आली आहे.

खचलेला रस्ता सुस्थितीत व वाहतुकीसाठी खुला करण्यास योग्य असल्याचे आय.आय.टी., मुंबई यांनी दिनांक ०७/०७/२०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविले असून, सदर रस्ता वाहतुकीस खुला करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई शहरातील महानगरपालिकेच्या मोकळया जागांबाबत

(२४) * ३१०९६ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील महानगरपालिकेची मोकळी मैदाने, उद्याने इत्यादीकरिता निश्चित धोरण लागू करण्याचे काम अंतिम टप्प्यात आले असतानाही अद्याप ६० संस्थांनी उद्याने, मैदाने हस्तांतरित केली नसल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापैकी सर्वाधिक ३४ मोकळया जागा पश्चिम उपनगरातील आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दहिसर ते कांदिवली या भागातील सर्वाधिक २० मोकळया जागा अद्याप महानगरपालिकेच्या ताब्यात आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून ही सर्व मैदाने व उद्याने संस्थांकडून ताब्यात घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने दत्तक तत्वावर दिलेल्या २१६ भूखंडांपैकी १७४ भूखंड महानगरपालिकेने ताब्यात घेतले असून उर्वरित ४२ भूखंड ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरु आहे.
(२) व (३) महानगरपालिकेने ताब्यात घ्यावयाच्या उर्वरित ४२ भूखंडांपैकी ३१ भूखंड पश्चिम उपनगरातील असून दहिसर ते कांदिवली या भागातील १२ भूखंड महानगरपालिकेने ताब्यात घेणे बाकी आहे.
(४) व (५) भूखंड टप्प्याटप्प्याने ताब्यात घेण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

मैत्रेय ग्रुप ऑफ कंपनीने केलेल्या फसवणुकीबाबत

(२५) * ३३८३६ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मैत्रेय ग्रुप ऑफ कंपनीने विविध प्रलोभने दाखवून नागरिकांकडून पैसे घेऊन त्यांची फसवणुक करणे तसेच परताव्याबाबत टाळाटाळ करणे व इतर गैरप्रकारावरून परभणी येथील नागरिकांनी सन २०१६-१७ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हाधिकारी, परभणी यांचेकडे चौकशी करून न्याय देण्याबाबतची मागणी लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित कंपनीच्या व्यवहाराची व कारभाराची चौकशी करण्यात आली आहे काय तसेच कंपनीविरूध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, संबंधित नागरिकांच्या परताव्याबाबत शासनस्तरावरून कोणती कार्यवाही केली वा किती मुदतीत संबंधितांना परतावा परत करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) परभणी जिल्ह्यात मैत्रेय कंपनीविरुद्ध १ गुन्हा दाखल झाला आहे.

दिनांक १३/०७/२०१६ रोजी सदर गुन्ह्यातील फिर्यादी यांनी त्यांची व इतर १३३ लोकांची १७,२६,३४०/- रुपयांची मैत्रेय कंपनीने फसवणुक केल्याबाबत फिर्याद दिली आहे, त्यानुसार नानलपेठ पोलीस स्टेशन, परभणी येथे गु.र.नं. ३२२/२०१६ भा.दं.वि. कलम ४२०, ४०६, ४६५, ४६८, ४७१, ३४, सह एम.पी.आय.डी. कायदा १९९९ चे कलम ३, ४ व द प्राईज चिट्स ॲन्ड मनी सर्क्युलेशन (बॅनिंग) स्किम, १९७८ चे कलम ३, ४, ५, ६ अन्वये १० आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यात १ आरोपीस अटक करून त्याच्याविरुद्ध मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. तसेच इतर आरोपींविरूद्ध सी.आर.पी.सी. कलम २९९ प्रमाणे मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले असून, फरार आरोपींचा शोध घेण्यात येत आहे.

(४) विलंब झालेला नाही.

चाकण (जि.पुणे) नगरपरिषद हद्दीत एक्झार्बिया या विकासकाने परवानगीपेक्षा अतिरिक्त मजल्यांचे बांधकाम केल्याबाबत

(२६) * ३१७७८ श्री.रविंद्र फाटक : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकण (जि.पुणे) नगरपरिषद हद्दीतील २१४६ घरांचा गृह प्रकल्प असलेल्या एक्झार्बिया या विकासकाने पी.एम.आर.डी.ए. ने दिलेल्या परवानगीपेक्षा अतिरिक्त मजल्यांचे बांधकाम केल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गृह प्रकल्पात २१४६ कुटुंबांची फसवणूक होण्याचा धोका निर्माण झाल्याने सदर विकासकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.

(३) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.

चाकण नगरपरिषदेच्या हद्दीत असलेल्या एक्झार्बिया या विकासकाच्या गृहप्रकल्पास यापुर्वीचे नियोजन प्राधिकरण उपविभागीय अधिकारी खेड उपविभाग, खेड व त्यानंतरचे नियोजन प्राधिकरण PMRDA यांनी दिलेल्या अकृषिक परवानगी/बांधकाम परवानगी नंतर विद्यमान नियोजन प्राधिकरण, नगरपरिषद चाकण यांनी दिनांक २/३/२०१७ रोजीच्या आदेशान्वये एकत्रित गट क्रमांकासह सुधारीत बांधकाम परवानगी दिली असून ती अनुज्ञेय क्षेत्रानुसार आहे. त्यामध्ये १६२४ सदनिका मंजूर आहेत. नगर परिषदेने दिलेल्या अहवालानुसार जागेवर चालू असलेले बांधकाम मंजूरीप्रमाणे आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील मेट्रो-३ प्रकल्पाच्या कंत्राटामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

(२७) * ३४०६० श्री.नारायण राणे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील कुलाबा ते सिप्झ दरम्यान वाहतुक सुविधा निर्माण करण्यासाठी बांधण्यात येत असलेल्या मेट्रो-३ प्रकल्पासाठी निविदा मागविल्यानंतर कंत्राटाची मुंबई मेट्रो कोर्पोरेशनने मूळ अंदाजित रक्कम १४,०११ कोटी रुपयांवरून १८% वाढून रुपये १६,४९६ कोटी करण्यात आली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी तत्कालीन अपर मुख्य सचिव (वित्त) यांनी पारदर्शकता कायम राहण्यासाठी निविदा प्रक्रिया पुन्हा नव्याने सुरु करण्याचा अभिप्राय दिला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अप्पर मुख्य सचिव (वित्त) यांच्या अभिप्रायाकडे दुर्लक्ष करून मेट्रो-३ प्रकल्पाचे कंत्राट १८,११५ कोटी रुपयांना देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकल्पाच्या वाढलेल्या मूळ अंदाजित रकमेला राज्य मंत्रिमंडळाची मान्यताही घेण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) मेट्रो-३ ची मूळ अंदाजित किंमत दिल्ली मेट्रो टप्पा-३ च्या दरांवर आधारित होती. तथापि, या दोन्ही प्रकल्पांच्या स्वरुपात असलेल्या तफावतींचा त्यात विचार झाला नव्हता. जवळ जवळ २८ मुद्यांवर असलेला फरक विचारात घेऊन प्रकल्पाची वास्तवदर्शी किंमत कळावी यासाठी जायका संस्थेने दिलेल्या सूचनेनुसार आणि मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या संचालक मंडळाच्या मान्यतेने अंदाजपत्रकिय रकमेत सुधारणा करण्यात आली.
(२) व (३) मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनचे एक संचालक, अतिरिक्त मुख्य सचिव (वित्त) यांनी पुन्हा निविदा काढण्याचे अभिप्राय दिले नव्हते. त्यांचे अभिप्राय हे निविदा प्राप्त झाल्यानंतर अंदाज पत्रक सुधारित केल्यामुळे निर्माण होऊ शकणा-या पारदर्शकतेच्या मुद्यांबाबत आणि केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सुचनांचे पालन करण्याबाबत होते. त्याची गंभीर दखल घेवून संचालक मंडळातील केंद्र व राज्य शासनाच्या ५ वरिष्ठ अधिका-यांची उपसमिती आणि डॉ.ई.श्रीधरन यांच्या मार्फत सर्व प्रक्रियेची आणि कागदपत्रांची सखोल तपासणी करुन सदर मुद्यांमध्ये तथ्य नसल्याचे व सर्व प्रक्रिया नियमानुसार असल्याचे निदर्शनास आल्यानंतरच निविदेबाबत मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून पुढील कार्यवाही करण्यात आली.
(४), (५) व (६) स्थापत्य कामाची निविदा रक्कम ही मंत्रिमंडळाने मंजूर केलेल्या मुळ प्रकल्प किंमतीच्या मर्यादेत आहे. त्यामुळे सदर प्रकल्पातील सर्व निविदा अंतिम झाल्यानंतर मुळ किंमतीवर होणारा परिणाम विचारात घेऊन सुधारीत प्रकल्प अहवालास आवश्यक त्या मान्यता कालांतराने घेण्याची मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनची तजवीज आहे.

परटवणे, मिऱ्या (जि.रत्नागिरी) येथील पाच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना पोलिसांनी अमानुष मारहाण केल्याबाबत

(२८) * ३२४२० श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परटवणे, मिऱ्या (जि.रत्नागिरी) येथील पाच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना चौकशीच्या नावाखाली ग्रामीण पोलिसांनी अमानुष मारहाण केली असून त्यांनी बोटांमध्ये टाचण्या घुसवणे, तर एका तरुणाच्या गुप्तांगाला शॉक दिल्याचे अशी अमानुष कृत्ये केली असल्याचे दिनांक ९ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी ग्रामीण पोलीस स्थानकातील कर्मचा-यांवर गुन्हा दाखल करावा अशी मागणी प्रिया आयरे यांनी पोलीस अधिक्षक यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.

सदर प्रकरणाची अपर पोलीस अधिक्षक, रत्नागिरी यांनी सविस्तर चौकशी केली असून त्यामध्ये तरूणांना अमानुष मारहाण केलेबाबतची कोणतीही वस्तुस्थिती निष्पन्न झालेली नाही. तसेच सदर तरूणांच्या वैद्यकीय तपासणी अहवालावरून देखील तसे दिसून आले नाही.

(२) श्रीमती आयरे व राजेंद्र आयरे यांचे कडून तक्रार अर्ज प्राप्त झाला आहे.

(३) सदर प्रकरणातील तरूण हे मध्यरात्री संशयितरित्या रेल्वे स्टेशन रोडजवळ फिरताना आढळून आल्याने व त्यांना रात्रगस्तीच्या पोलिसांनी चौकशीसाठी थांबणेबाबत इशारा करूनही त्यांनी पोलिसांच्या सुचनेकडे दुर्लक्ष करून पळून जाण्याचा प्रयत्न केला तसेच रात्रीच्या वेळी वावरण्याचे कारण विचारले असता सदर तरूणांनी समाधानकारक स्पष्टीकरण न देता पोलिसांना उडवाउडवीची उत्तरे दिल्याने त्यांना अधिक चौकशीसाठी पोलीस ठाण्यात आणले होते.

रत्नागिरी जिल्हयात सध्या शहरातील व ग्रामीण भागातील घरफोडी/चोऱ्यांना प्रतिबंध करण्याच्यादृष्टीने पोलीस कर्मचारी यांना संशयास्पद रितीने वावरणाऱ्या तरूणांची केलेली चौकशी ही मुंबई पोलीस कायदा कलम ६४(अ), (ब), (क) नुसार योग्य असून त्यात त्यांचा कोणताही संशयास्पद हेतु नसल्याचे दिसून आले आहे.

सदर प्रकरणाच्या एकूण चौकशीमध्ये, सदर तरूणांना पोलिसांनी चौकशीसाठी पोलीस ठाण्यात आणले मात्र घडलेल्या घटनेबाबत पोलिसांनी वरिष्ठांना कल्पना न दिल्याने पोलीस दलाची प्रतिमा मलीन झालेली आहे. सदर प्रकरणातील पोलीस कर्मचाऱ्यांना आपली जबाबदारी व कर्तव्ये न समजल्याने त्यांनी सदर प्रकरणात कसुरी केल्याचे दिसून आल्याने सदर पोलीस कर्मचाऱ्यांना रत्नागिरी पोलीस अधिक्षक कार्यालयाच्या दिनांक १९/६/२०१७ आदेशान्वये त्यांची पुढील वार्षिक वेतनवाढ पुढील वेतनवाढीवर परिणाम होणार नाही अशा प्रकारे २ वर्षे रोखण्याची शिक्षा देण्यात आलेली आहे. तसेच सदर कर्मचाऱ्यांची पोलीस अधिक्षक, रत्नागिरी कार्यालयाचे दिनांक २०/६/२०१७ च्या आदेशान्वये ग्रामीण पोलीस ठाण्यातून जिल्हयातील अन्य ठिकाणी बदली करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील कुलाबा, कफ परेड, बॅकबे रिक्लमेशन येथील झोपडपट्टीधारकांना अपात्र ठरविल्याबाबत

(२९) * ३४४७७ ॲड.राहुल नार्वेकर : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कुलाबा, कफपरेड, बॅकबे रिक्लमेशन येथील सी.एस.नं. ६५१ व इतर सी.एस.नंबर वरील आंबेडकरनगर व गणेशमुर्तीनगर येथील झोपडपट्टीधारकांना उपजिल्हाधिकारी निष्कासन, कुलाबा विभाग यांनी पात्रता निश्चित करताना अत्यंत कमी रहिवाशांना पात्र ठरवून मोठया प्रमाणात रहिवाशांना अपात्र ठरविण्यात आल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयामुळे सुमारे २ ते ३ हजार रहिवाशांनी नियमाप्रमाणे अप्पर जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्याकडे अपील दाखल केले आहे, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, प्रश्न भाग क्र. (१) व (२) बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार ज्या झोपडपट्टीधारकांना अपात्र ठरविले आहे त्यांच्या पात्रतेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता : (१) अपर जिल्हाधिकारी (अति./निष्का.), मुंबई शहर यांच्या प्राप्त अहवालानुसार उपजिल्हाधिकारी (अति./निष्का.) तथा सक्षम प्राधिकारी, कुलाबा विभाग यांनी शासन निर्णय, दिनांक१६/५/२०१५ मधील निकषानुसार झोपडीधारकांनी सादर केलेल्या पुराव्यानुसार विहित पुरावे तपासून झोपडीधारकांची पात्र/अपात्रता निश्चित करण्यात आली आहे.

(२) व (३) उपजिल्हाधिकारी (अति./निष्का.) तथा सक्षम प्राधिकारी, कुलाबा विभाग यांचेकडून पात्र/अपात्रता निश्चित केल्यानंतर अपात्र झोपडीधारकांनी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ च्या कलम ३५ अन्वये अपर जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचेकडे १२५५ झोपडीधारकांनी पात्रतेसाठी अपील अर्ज दाखल केले आहेत. त्यापैकी १२० झोपडीधारकांचे झोपडे बंद / नांव सांगण्यास नकार दिल्याने अपिल स्थानिक चौकशी करण्याकरिता सक्षम प्राधिकाऱ्याकडे पाठविण्यात आले असून, ११३५ झोपडीधारकांची अपिले अपर जिल्हाधिकारी (अति./निष्का.), मुंबई शहर यांचेकडे प्रलंबित आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेची रुक्मिणीबाई आणि शास्त्रीनगर रुग्णालये शासनाकडे हस्तांतरित करणेबाबत

(३०) * ३१३७२ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक १७८१५ ला दिनांक ३० मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या महासभेने ठराव करून शहरातील रुग्णांना चांगली रुग्णसेवा मिळण्यासाठी महानगरपालिकेची रुक्मिणीबाई आणि शास्त्रीनगर रुग्णालये शासनाकडे हस्तांतरित करून घेण्याची विनंती केली असतानाही माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान सदरहू ठरावांना डावलून नवीन ८३ पदांना मंजुरी दिली असून सदरहू पदांना मंजुरी देण्यापूर्वीही महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागातील सुमारे ३० पदे रिक्त होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आजमितीस महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागातील एकूण ११५ मंजूर पदांपैकी फक्त ५४ पदे भरली असून अद्याप ६४ पदे रिक्त असल्याने त्याचा रुग्णसेवेवर मोठ्या प्रमाणात परिणाम होत असून अनेकदा रुग्णांना खाजगी रुग्णालयात अथवा मुंबई, ठाणे येथे पाठविण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेने वारंवार जाहिराती देऊनही त्यास फारसा प्रतिसाद मिळत नसल्याची बाब स्थानिक लोकप्रतिनिधीनी सन २००९ पासून शासनाच्या निदर्शनास आणून देत असताना त्याकडे दुर्लक्ष करून शासनाने आस्थापना खर्चाची अट शिथिल करून शासन निर्णय क्र.कडोंमपा-१०७७/४५३/प्र.क्र.१८३/०७/नवि-२८ दिनांक ४ जून, २०१५ नुसार नवीन पदांना मंजुरी देण्याचे कारण काय आहे,

(४) असल्यास, महानगरपालिकांनी सादर केलेल्या ठरावानुसार शासनाने (१) शासन निर्णय एमयुपी-२०१५/प्र.क्र.३१०/नवि-१९ दिनांक ३० जून, २०१५ रोजी इचलकरंजी नगरपरिषदेचे इंदिरा गांधी मेमोरियल हॉस्पिटल, (२) शासन निर्णय एमयुपी-२०१६/प्र.क्र.३०९/नवि-१९ दिनांक १७ नोव्हेंबर, २०१६ रोजी अंबरनाथ नगरपरिषदेचे कै. जी.बी.छाया रुग्णालय हॉस्पिटल व (३) शासन निर्णय-मिभाम-१११६/प्र.क्र.६८/२०१६/नवि-२८, दिनांक ३० नोव्हेंबर, २०१६ रोजी मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे पंडित भीमसेन जोशी रुग्णालय

(टेंबा रुग्णालय) हस्तांतरित करून घेतलेली असताना कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेची रुग्णालये हस्तांतरित करून घेण्यास असमर्थता दर्शविण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडून जाहिराती देऊनही मागील दीड वर्षापासून त्याला प्रतिसाद मिळत नसल्याने रुग्णांना त्रास होत असल्याने येथील रुग्णांना चांगली आरोग्य सेवा पुरविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) अंशतः खरे आहे.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या नियंत्रणाखालील रुग्णालये/नागरी आरोग्य केंद्रांकरीता वैद्यकीय संवर्गातील ८३ पदांना शासन मान्यता देण्यापूर्वी महानगरपालिकेच्या आस्थापनेवर वैद्यकीय अधिकाऱ्यांची ३२ पदे मंजूर होती. त्यापैकी तेव्हा २३ पदे कार्यरत, तर ९ पदे रिक्त होती.

(२) सद्य:स्थितीत एकूण ११५ मंजूर पदांपैकी ६४ पदे रिक्त आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

महानगरपालिकेच्या रुग्णालयात उपलब्ध तज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत रुग्णांवर उपचार केले जातात. तथापि, रेडिओलॉजीस्ट व फिजिशियन या पदांवर सद्य:स्थितीत तज्ञ उमेदवार उपलब्ध न झाल्याने काही विशेष सुविधा रुग्णालयात उपलब्ध नाहीत. त्यामुळे अतितातडीच्या प्रसंगी I.C.U. व N.I.C.U., सिटी स्कॅन इत्यादीची आवश्यकता भासल्यास प्रथमोपचार देवून, रुग्णास मुंबई व ठाणे येथे पाठविण्यात येते.

(३) महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागातील रिक्त पदे भरण्याकरीता दिनांक २१/१२/२०१०, दिनांक २५/०९/२०१२ व दिनांक १४/१२/२०१२ रोजी जाहिराती प्रसिद्ध करण्यात आल्या. तथापि, त्यास पुरेसा प्रतिसाद मिळाला नाही. वैद्यकीय अधिकाऱ्यांची निकड लक्षात घेता, आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी त्यांच्या दिनांक २७/०३/२०१५ च्या पत्रान्वये शासनास केलेल्या विनंतीनुसार कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या आस्थापनेवर वैद्यकीय संवर्गातील एकूण ८३ पदे निर्माण करण्यास शासन निर्णय दिनांक ०४/०६/२०१५ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

(४) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेची रुक्मिणीबाई रुग्णालय, कल्याण (प.) व शास्त्रीनगर रुग्णालय, डोंबिवली (प.) ही रुग्णालये शासनाकडे हस्तांतरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) सद्य:स्थितीत महानगरपालिकेच्या उक्त दोन्ही रुग्णालयात उपलब्ध असलेल्या तज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत रुग्णांना चांगल्या आरोग्य सेवा पुरविण्यात येतात. या व्यतिरिक्त केंद्र व राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व राष्ट्रीय कार्यक्रमांची महानगरपालिका क्षेत्रात प्रभावी अंमलबजावणी करण्यात येते.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

मालाड (मुंबई) येथील ओरलेम चर्च समोरील गौतम बुध्द रोडच्या दुरुस्तीचे काम प्रलंबित असल्याबाबत

(३१) * ३३९१८ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालाड (मुंबई) येथील ओरलेम चर्च समोरील गौतम बुध्द रोडच्या दुरुस्तीच्या कामाचे भूमीपुजन माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान झाले असून या कामाला सुरुवात झाली नसल्याचे दिनांक २४ एप्रिल,२०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) मालाड येथील ओरलेम चर्चसमोरील गौतम बुध्द रोडच्या दुरुस्तीच्या कामाचे भूमीपुजन अद्यापि झालेले नाही.

(२) व (३) सदर रस्ता २४० मी. लांबीचा असून, महानगरपालिकेमार्फत त्याच्या दुरुस्तीचे काम सन २०१७-१८ मध्ये प्रस्तावित करण्यात आले आहे.

त्यानुषंगाने सदर रस्त्याची संकल्पचित्रे व अंदाजपत्रक बनविण्याचे काम महानगरपालिकेमार्फत सुरु असून, सदर काम झाल्यानंतर निविदा मागविण्याची प्रक्रिया सुरु करण्यात येणार आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील विविध गैरव्यवहाराबाबत

(३२) * ३१२२३ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे : तारांकित प्रश्न क्रमांक १९८२२ ला दिनांक २० जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेत रस्त्यांच्या कामात सुमारे ३५० कोटी रुपयांचा झालेला गैरव्यवहार, कचरा वाहून नेण्याच्या कामात सन २०१२ ते २०१७ या कालावधीत सुमारे ८९८.३३ कोटी रुपयांचा झालेला गैरव्यवहार तसेच नाले सफाईच्या कामात सन २०१५ ते २०१७ या दोन वर्षाच्या कालावधीत सुमारे २८० कोटी रुपयांचा झालेला गैरव्यवहार याबाबत सुरु करण्यात आलेली चौकशी पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व यासाठी अजून किती कालावधी लागणे अपेक्षित आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (२) व (३) रस्त्यांच्या कामातील अनियमितता, कचरा वाहून नेण्याच्या कामातील गैरव्यवहार तसेच नालेसफाईच्या कामातील गैरव्यवहाराच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

१) रस्ते गैरव्यवहार प्रकरणी चौकशी करण्यात आली असून त्याबाबत महानगरपालिकेमार्फत केलेली कार्यवाही खालीलप्रमाणे आहे :-

पहिला टप्पा :-

- ६ कंत्राटदार तसेच २ त्रयस्थ लेखापरिक्षक यांच्याविरुध्द दिनांक २७/०४/२०१६ रोजी एफ.आय.आर. दाखल करण्यात आला आहे.
- महानगरपालिकेच्या २ प्रमुख अभियंता व १ कार्यकारी अभियंता यांना अटक करण्यात आली होती. तत्पूर्वी हे ३ अधिकारी व अन्य १ कार्यकारी अभियंता अशा एकूण ४ जणांना निलंबित करण्यात आले आहे.
- ६ अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी करण्यात येत आहे.

- अन्य ९४ अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द दोषारोप पत्र बजाविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
- कंत्राटदार व त्रयस्थ लेखापरिक्षक यांना काळ्या यादीत टाकण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

दुसरा टप्पा :-

- १९० अधिकारी / कर्मचाऱ्यांविरुध्द दोषारोपपत्र बजावण्याची कार्यवाही सुरु आहे.
- ११ कंत्राटदारांना काळया यादीत टाकण्याची कार्यवाही सुरु आहे.
- संबंधित कंत्राटदारांना चौकशीमध्ये समाविष्ट असलेल्या रस्त्यांची देयके देण्यात येणार नाहीत.
- तसेच, दंडाच्या रकमेएवढी रक्कम रोखून धरण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत.

२) कचरा वाहून नेण्याच्या कामातील अनियमितता :-

कचरा वाहून नेण्याच्या कामातील अनियमितेबाबत वारंवार प्राप्त होणाऱ्या तक्रारींच्या अनुषंगाने दिनांक ०२/१२/२०१६ पासून महानगरपालिकेमार्फत प्राथमिक चौकशी करण्यात येत आहे.

३) नालेसफाई :-

कंत्राटदार व ठेकेदारांवर केलेली कारवाई :-

- ३ नालेसफाई कंत्राटदार, १ व्ही.टी.एस. कंत्राटदार व ३ वजनकाटा ठेकेदार यांचेविरोधात आझाद मैदान पोलीस ठाणे दिनांक १९/०९/२०१५ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला असून, सदर प्रकरण दिनांक ०७/११/२०१५ रोजी आर्थिक गुन्हे आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागाकडे हस्तांतरित करण्यात आले आहे.
- नालेसफाईच्या ३२ कंत्राटांसंबंधीत सविस्तर चौकशीअंती २४ नालेसफाई कंत्राटदार २ व्ही.टी.एस. कंत्राटदार व ८ वजनकाटा ठेकेदार यांच्या विरोधात आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागाकडे दिनांक ३०/१२/२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

- त्या अनुषंगाने ५ नालेसफाई कंत्राटदारांना अटक करण्यात आले असून, त्यांची जामीनावर मुक्तता झाली आहे. याबाबत पुढील कार्यवाही सुरु आहे.
- २४ नालेसफाई कंत्राटदारांना काळया यादीत टाकण्यात आले आहे.

अधिकारी व कर्मचाऱ्यांविरोधात कारवाई :-

- नालेसफाईच्या अनियमितेत जबाबदार असणाऱ्या संबंधित १४ जणांविरुध्द खात्यांतर्गत सर्वंकष चौकशी करण्याकरीता श्री.राजीव कुकनुर, उपायुक्त, अभियांत्रिकी यांची नेमणूक करण्यात आली होती.
- १३ कर्मचाऱ्यांना सेवेतून निलंबित करण्यात आलेले आहे. सदर कर्मचाऱ्यांविरुध्द व १ सेवानिवृत्त कर्मचारी यांचेविरुध्द खात्यांतर्गत चौकशी पूर्ण झाली असून, शिक्षादेश बजावण्याची कार्यवाही सुरु आहे.
- नालेसफाईच्या ३२ कंत्राटांसंबंधीत सविस्तर चौकशीअंती अन्य ३५ अधिकारी व कर्मचारी यांचा सहभाग निश्चित करुन त्यांचेवर दोषारोपपत्रे बजावण्यात आलेली आहेत. तसेच, ६५ अधिकारी व कर्मचारी यांचेवर दोषारोपपत्रे बजावण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये प्रोजेक्टची जाहिरात करुन गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याबाबत

(३३) * ३२४९९ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यामध्ये फार्म हाऊस, भव्य कुंपण आणि आतमध्ये विविध फळांची झाडे अशी प्रोजेक्टची जाहिरात करुन गुंतवणूकदारांची फसवणूक करणा-या टोळीला दिनांक १४ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास संदिप जाधव आणि सुदर्शन जाधव यांच्यासह सात जणांना मुंबई पोलिसांनी अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आरोपींवर कोणत्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला व त्यांचेवर कोणती कारवाई केली आहे,

(३) असल्यास, या प्रोजेक्टमध्ये किती रकमेची फसवणूक करण्यात आली आहे,

(४) असल्यास, या प्रोजेक्टमधील गुंतवणूकदारांना त्यांचे पैसे परत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (२), (३) व (४) सदर प्रकरणी पवई पोलीस स्टेशन येथे एम.ई.सी.आर. क्र. ५/२०१६, भा.दं.वि. कलम ४२०, ४०६, ३४ अन्वये एकूण १२ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नमूद गुन्ह्यात अद्यापपर्यंत ३ आरोपींना अटक केली आहे.

या प्रोजेक्टमध्ये अद्यापपर्यंत रुपये १,३३,५८,१०६/- इतक्या रकमेची फसवणूक झाल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

सदर गुन्ह्यात आरोपींची मालमत्ता जप्त करण्यासाठी मा.न्यायालयात अहवाल सादर केलेला असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

अलिबाग कोळीवाडा मच्छिमार जेट्टीचे बांधकाम अपूर्ण असल्याबाबत

(३४) * ३२४५७ श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील अलिबाग कोळीवाडा येथे मच्छिमार जेट्टी बांधण्यासाठी निधी उपलब्ध असतानाही संबंधित मे.एस.के.कन्स्ट्रक्शन या कंपनीला कार्यादेश देण्यात येवूनही माहे जून, २०१७ पर्यंत जेट्टीच्या कामास सुरूवात केली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाने संबंधित ठेकेदारावर विहित मुदतीत काम न केल्याने निविदा शर्तीनुसार कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जेट्टीचे काम ४ वर्षापूर्वी कार्यादेश होवूनही पूर्ण न झाल्याने मच्छिमारांना माल उतरविण्यासाठी अनेक संकटांना तोंड द्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) होय.

(४) महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डामार्फत राबविल्या जाणा-या निविदा प्रक्रियेत सहभाग घेण्यास सदर कंपनीस पाच वर्षाकरीता बंदी घालण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे सदर कामाचे कार्यादेश रद्द करुन या कामाची फेर निविदा दिनांक १९/०६/२०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. निविदा प्रक्रिया कार्यवाही बाकी आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईत एसआरए योजनांमधील अनेक शाळांच्या पुनर्वसनाची कामे प्रलंबित असल्याबाबत

(३५) * ३४०४२ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत एस.आर.ए. योजनांमधील अनेक शाळांच्या पुनर्वसनाची कामे प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेंतर्गत ज्या शाळा बांधून झाल्यात त्याचे हस्तांतरण करण्यास विकासक टाळाटाळ करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी शासनाने या शाळा ताब्यात घेऊन महापालिकेला हस्तांतरित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता : (१), (२) व (३) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील शाळांच्या पुनर्वसनाचे काम विक्री घटक व पुनर्वसन योजनेच्या कामाबरोबरच करण्यात येते. विक्री घटक/ पुनर्वसन योजनेचे काम पूर्ण झालेल्या इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र देण्यापूर्वी शाळांचे हस्तांतरण करणे बंधनकारक आहे. ज्या इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येते तेथील शाळांचे हस्तांतरण विक्री घटक/ पुनर्वसन योजने बरोबरच करण्यात येते. अशा प्रकरणी जो पर्यंत शाळा हस्तांतरण करत नाही, तोपर्यंत विकासकास विक्री घटकांच्या इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र दिले जात नाही असा प्राधिकरणाचा अहवाल आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

बोरिवली येथील धारावी बेटावरील स्थानिकांच्या प्रारूप विकास आराखड्याच्या हरकतीच्या सुनावणीबाबत

(३६) * ३४४८० श्री.आनंद ठाकूर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरिवली येथील धारावी बेटावरील अनुक्रमे उत्तन, गोराई, मनोरी चौक, डोंगरी, तारोडी व मोर्वा या गावातील प्रारूप विकास आराखड्याच्या सूचना व हरकती नोंदविणाऱ्या लोकांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्यामुळे तेथील लोकांना सुनावणीसाठी बांद्रा येथील मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यालयात जावे लागत असल्यामुळे माहे जून, २०१७ मध्ये असलेली सुनावणी त्याच गावात अधिकाऱ्यांमार्फत किंवा महानगरपालिकेच्या प्रशासकीय कार्यालयात घेण्याबाबत धारावी बेट बचाओ समितीच्या अध्यक्षांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक १४ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१६ ते २०३६ च्या सदर प्रारूप विकास आराखडयासंदर्भात हरकतीच्या सुनावणी नोंदविणाऱ्या भूमिपुत्रांसाठी त्यांच्या गावात विभागनिहाय अधिकाऱ्यांमार्फत किंवा महानगरपालिकेच्या प्रशासकीय कार्यालयात घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, धारावी बेट बचाओ समितीने त्यांचे दिनांक १३/६/२०१७ व दिनांक १५/६/२०१७ च्या पत्रान्वये त्याच गावात अधिकाऱ्यांमार्फत किंवा विभागात किंवा नगरपरिषद कार्यालयात सुनावणी आयोजित करावी, अशी विनंती केली आहे.

(२) सदर प्राप्त सुचना/हरकती बाबत तालुका स्तरावर नियोजन उप समितीमार्फत लवकरच सुनावणी घेण्यात येणार असून, त्याबाबत जिल्हा/ तालुका प्रशासनासोबत पत्रव्यवहार करण्यात आले आहेत. सदर सुनावणीबाबतचे वेळापत्रक स्थानिक वर्तमानपत्रात प्राधिकरणामार्फत प्रसिध्द करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील दादर, माहिम आणि प्रभादेवी परिसरातील इमारतीतील रहिवाशांना विकासकाने भाडे न दिल्याबाबत

(३७) * ३१४४६ श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील दादर, माहिम आणि प्रभादेवी परिसरातील सुमारे १९ इमारतीतील रहिवाश्यांना पुनर्विकासासाठी विकासकाने इमारती रिकाम्या करुन रहिवाशांना पर्यायी वास्तव्याचे भाडे देण्याचे कबूल करुनही गत दोन वर्षापासून रहिवाश्यांना भाडे देण्याचे बंद केल्याचे रहिवाश्यांनी मा.गृहनिर्माण राज्यमंत्री यांना दिनांक २८ एप्रिल, २०१७ रोजी लेखी निवेदनाद्वारे निदर्शनास आणले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकासकाने रहिवाश्यांना भाडे न दिल्यामुळे १९ इमारतीमधील दोन हजाराहून अधिक कुटुंबे विस्थापित झाली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्या विकासकाने इमारतींच्या विकासाला वा पुनर्बांधणीकरीता विलंब लावला आहे त्यांच्यावर कोणती दंडात्मक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता : (१) हे अंशत: खरे आहे. असा पत्रव्यवहार सदर रहिवाश्यांमार्फत मा. राज्यमंत्री, गृहनिर्माण यांना केल्याची बाब खरी आहे. तसेच या इमारतीतील भाडेकरु/ रहिवाश्यांमार्फत विकासकांकडून भाडे मिळत नसल्याबाबत, काम बंद असल्याबाबत, तसेच काम धिम्यागतीने सुरु असल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

(३) याबाबत, म्हाडाने अर्धवट/ रखडलेल्या अवस्थेत असलेल्या पुनर्विकास प्रकल्पासाठी शासन स्तरावर धोरण निश्चित करण्यासाठी प्रस्ताव शासनास सादर केलेला आहे. सदर प्रस्तावामध्ये ना हरकत प्रमाणपत्र रद्द करुन म्हाडाने मालमत्ता म्हाड अधिनियम, १९७६ प्रकरण ५ कलम ४१ मधील तरतुदीनुसार भूसंपादित करुन, उर्वरित काम पुर्ण करण्याची तरतूद केलेली आहे. सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

बोरिवली (पूर्व) येथील श्री.सदगुरु मिलेनियम टॉवर या सहकारी गृहनिर्माण संस्थेबाबत

(३८) * ३४०२३ श्री.रामहरी रुपनवर : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सदगुरुनगर, बोरिवली (पूर्व) येथील श्री.सदगुरु मिलेनियम टॉवर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या आर.जी. भूखंडावर जे.व्ही. रिअल्टी ॲण्ड डेव्हलपर्स या विकासकाला इमारत क्रमांक १० चे बांधकाम करण्यास झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाने परवानगी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आर.जी. भूखंडावर इमारतीचे मलकुंड असून इमारतीच्या बांधकाम साहित्याची ने आण करण्याकरिता संबंधित विकासक बेकायदेशीर व नियमबाहयरित्या रस्ता तयार करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इमारतीच्या मलकुंडाची वारंवार नासधूस केल्यामुळे मलकुंडाला जागोजागी तडे जाऊन त्यातून सतत दुर्गंधीयुक्त व आरोग्यदृष्टया घातक घाणीचे उत्सर्जन होत असून यामुळे या परिसरात दुर्गंधी व अस्वच्छता पसरल्यामुळे परिसरातील रहिवाशी आजारी पडत असून उक्त प्रकरणी

सहकारी गृहनिर्माण संस्थेने याबाबत आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, कार्यकारी अभियंता, झो.पु.पश्चिम उपनगर, कस्तुरबा मार्ग पोलीस ठाणे आणि कार्यकारी अधिकारी, झो.पु. यांना पत्राद्वारे वारंवार कळवून देखील विकासकावर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता : (१) होय.
(२), (३) व (४) सदर इमारत क्र.१० चे बांधकाम मूळ आराखडयातील इमारत क्र.७ व ८ मधील मोकळया जागेवर प्रस्तावित असून त्या जागी पूर्वी दाखविण्यात आलेल्या मनोरंजन मैदानाचे क्षेत्र त्याच अभिन्यासात पुन:स्थापित करण्यात आले. सदर जागेचे सपाटीकरण करताना मलकुंडास जे तडे गेले होते त्याच्या दुरुस्तीचे काम विकासकाने पूर्ण केले आहे. तसेच सोसायटीमधील रहिवाश्यांच्या आरोग्याच्या सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या गोष्टींची पूर्तता करण्यासाठी विकासक व वास्तुविशारदांना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने लेखी सूचना दिलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

दादर (मुंबई) येथील फुलमार्केट मधील कचऱ्याच्या समस्येबाबत

(३९) * ३२९१४ श्री.प्रविण दरेकर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दादर (मुंबई) येथील फुलमार्केटकडे जाणारा पुल आणि पुलाखालील कोपऱ्यात मागील दोन-तीन महिन्यापासून कचरा उचलला नसल्याने परिसरात दुर्गंधी व घाण पसरल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचा कचरा उचलण्याकरिता महानगरपालिका प्रशासनाकडे मागणी करुनही कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पावसाळयात साथीचे आजार पसरत असल्याने सदरील कचरा उचलण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) दादर रेल्वे स्थानक, केशवसुत पुलालगत कचऱ्याचे साम्राज्य व अस्वच्छता अशा आशयाची बातमी माहे जुलै, २०१७ मध्ये स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती ही वस्तुस्थिती आहे.
(२) व (३) सदर कचरा उचलण्याकरिता महानगरपालिकेमार्फत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे :-

- सदर ठिकाणी सकाळी ६.३० ते दुपारी १ या वेळेत महानगरपालिकेचे २८ सफाई कामगार व दुपारी २ ते रात्री १० या वेळेत महानगरपालिकेचे १२ व नोंदणीकृत अशासकीय संस्थांचे ८ सफाई कामगार यांचेमार्फत आवश्यक त्या साधनसामुग्रीसह साफसफाई केली जाते.
- सदर ठिकाणी कचरा वाहतुकीसाठी ३ टन क्षमतेचा १ ट्रॅक्टर, ५ टन क्षमतेचे ३ डम्पर, ६ टन क्षमतेचे ४ मोठे कॉम्पॅक्टर कार्यरत असतात.
- सदर ठिकाणी प्रतिदिन सुमारे ९५ ते १०० मे. टन कचरा उचलण्यात येतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईत डॉप्लर रडार कार्यान्वित होण्यासाठी महानगरपालिकेची जमीन हवामान विभागाकडे हस्तांतरित करणेबाबत

(४०) * ३१७६५ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.जयवंतराव जाधव, श्रीमती हुस्नबानू खलिफे : तारांकित प्रश्न क्रमांक २७७३० ला दिनांक २२ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पावसाचे पुर्वानुमान, पावसाचा अंदाज आणि समुद्रातुन येणाऱ्या चक्रीवादळाची नोंद घेऊन वेळेत इशारा देणाऱ्या नवीन डॉप्लर रडारसाठी जोगेश्वरी (मुंबई) येथील वेरावळी जवळील प्रादेशिक हवामान विभागाने निश्चित केलेली जागा बृहन्मुंबई महानगरपालिकेने व्यापारी भावाने जागेचा

मोबदला मागितल्यामुळे सदर जागा हवामान विभागाकडे हस्तांतरित करण्यास विलंब झाल्याचे दिनांक १३ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांचे अतिवृष्टी आणि चक्रीवादळापासून संरक्षण करण्यासाठी आवश्यक असलेल्या डॉप्लर रडारची कार्यवाही त्वरित होण्यासाठी जमीन विनामोबदला हवामान विभागाकडे हस्तांतरित करण्यासाठी शासन निर्देश देणार आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (२) व (३) वेरावली उच्चस्तर जलाशय येथील ९०० चौ.मी. जागा १० आठवडयांत भारतीय हवामान खात्यास हस्तांतरित करण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने २५% सवलतीच्या दराने रुपये ५५,९६,८७५/- एवढे एकरकमी अधिमुल्य व रुपये ९००/- प्रतिवर्ष प्रमाणे भुईभाडयाचा भरणा करण्याविषयी महानगरपालिकेमार्फत भारतीय हवामान खात्यास दिनांक ३०/१२/२०१६ रोजी कळविण्यात आले होते.

तथापि, भारतीय हवामान खाते यांनी दिनांक ०९/०२/२०१७ रोजी अधिमुल्य व पोच मार्गाबाबत परवाना शुल्क माफ करण्याची विनंती केली होती.

यासंदर्भात शासनाकडून निर्देश प्राप्त होईपर्यंत, महानगरपालिका सदर जागेचा ताबा देण्यास तयार असल्याचे दिनांक १८/०३/२०१७ रोजी भारतीय हवामान खात्यास कळविण्यात आले होते.

तद्नंतर सदर जागेचा ताबा भारतीय हवामान खाते यांना १० दिवसांत देण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने दिनांक १०/०४/२०१७ रोजी महानगरपालिकेस निर्देश दिले आहेत.

त्यानुषंगाने सदर जागेचा ताबा घेण्याबाबत महानगरपालिकेमार्फत दिनांक १३/०४/२०१७ रोजी भारतीय हवामान खाते यांना कळविण्यात आले असून अद्यापपर्यंत सदर जागेचा ताबा त्यांचेकडून घेण्यात आलेला नाही.

मुंबईतील मिठी नदीच्या संवर्धनाबाबत

(४१) * ३१५९१ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्रीमती स्मिता वाघ : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिकेने मिठी नदीच्या संवर्धनासाठी कृती आराखडयाचे काम हाती घेतले असून या कामात मिठी नदी प्रवाहित ठेवण्यावर भर दिला जाणार असून नदीतील प्रदूषण कमी करण्याच्यादृष्टीने महानगरपालिकेने अभ्यास गटाची नियुक्ती केली असल्याचे दिनांक ११ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मिठी नदीच्या रुंदीकरण व खोलीकरणाचे काम ९० टक्के पूर्ण झाल्यानंतरही नदीत जाणाऱ्या मलनि:स्सारण वाहिन्यांचे पाणी तसेच सांडपाण्यामुळे दहा वर्षानंतरही या प्रकल्पाचा विकास प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या ठिकाणी सुमारे १ हजार ५०० अतिक्रमित बांधकामे झाल्यामुळे देखील या नदीचा विकास प्रलंबित आहे तसेच मुंबईला प्रत्येक दिवशी २४०० लाख लिटर सांडपाणी निर्माण होते पण त्यातील केवळ १५०० एमएलटी पाण्यावर प्रक्रिया करण्याची क्षमता आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून मिठी नदीच्या संवर्धनासाठी व मुंबईतील सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे आहे.

(२) मुख्य मलनि:स्सारण वाहिन्यांमधून कोणतेही मलजल मिठी नदीमध्ये सोडले जात नाही. तथापि, मिठी नदीच्या सभोवतालच्या अनधिकृत झोपडपट्टयांमधील सांडपाण्याचा निचरा मिठी नदीमध्ये होतो ही वस्तुस्थिती आहे.

(३) व (४) मिठी नदीच्या संवर्धनासाठी व मुंबईतील सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याबाबत महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

- मिठी नदीतील प्रदुषण कमी करणे व मिठी नदीचे संवर्धन व सुशोभिकरण करण्याकरिता महानगरपालिकेमार्फत अभ्यास गटाची नियुक्ती करण्यात आली आहे.
- मिठी नदीतील प्रदुषण कमी करण्याकरिता मे.फ्रिशमन प्रभु यांची दिनांक ०४/०१/२०१७ रोजी सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.
- मिठी नदी विकास प्रकल्पामुळे बाधित होणारी उर्वरित १५३९ बांधकामे हटविण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
- बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात प्रतिदिन सुमारे २१०० द.ल.लि. इतके मलजल निर्माण होते. यापैकी प्रतिदिन १६५९ द.ल.लि. इतक्या मलजलावर ७ मलजल शुध्दीकरण केंद्रांमार्फत प्रक्रिया करुन समुद्र व ठाणे खाडीमध्ये सोडण्यात येते.
- पवई येथे प्रतिदिन ८ द.ल.लि. क्षमतेचे नवीन मलजल प्रक्रिया केंद्र उभारण्याचे प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे-भिवंडी-कल्याण या मेट्रोमार्ग-५ च्या बांधकामाबाबत

(४२) * ३३५०० ॲड.अनिल परब : तारांकित प्रश्न क्रमांक २४८५६ ला दिनांक १४ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे - भिवंडी - कल्याण दरम्यानच्या मेट्रो मार्ग-५ ला राज्य शासनाने दिनांक १९ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास मंजूरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मेट्रोमार्गाच्या बांधकामास अद्याप सुरुवात झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामास कंव्हा सुरुवात होणार आहे व सदर काम विहीत वेळेत पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) नाही.

(२) होय.

(३) व (४) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक १९/१०/२०१६ रोजी झालेल्या १४१ व्या बैठकीत मे.डी.अपोलोनिया, इटली यांनी सादर केलेल्या ठाणे-भिवंडी-कल्याण या मेट्रो मार्गाच्या सविस्तर प्रकल्प अहवालास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मान्यता दिली आहे. या प्रकल्पास राज्य शासनाची मान्यता देण्याच्या अनुषंगाने सदर प्रस्ताव शासनस्तरावर तपासण्यात येत आहे.

मुंबईत अंमलीपदार्थाच्या विक्रीला प्रतिबंध करण्याबाबत

(४३) * ३२६०१ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत दिवसाला सुमारे २५ लाख रुपयांहून अधिक अंमलीपदार्थाची तस्करी होत असून हे नशेचे पदार्थ मोठया प्रमाणात तरुणाईला विकत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये कॉलेज परिसरातील विशेषत: अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सहभाग मोठया प्रमाणात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तरुणाईला अंमलीपदार्थापासून परावृत्त करण्यासाठी तसेच या तस्करीला प्रतिबंध करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) अंमली पदार्थ विरोधी कक्षाने (दिनांक ०१/०१/२०१७ ते २४/०७/२०१७ पर्यंत) एकुण २७७ किलो १४१ ग्रॅम एवढे अंमली पदार्थ, अंदाजित किंमत रुपये ८,८४,८४,३००/- जप्त केले आहेत.

(२) सन २०१७ मध्ये आतापावेतो अंमली पदार्थ विरोधी कक्षाने एकूण ४१ गुन्हे दाखल केले असून त्यामध्ये एकूण ८६ आरोपींना अटक केलेली आहे.

एकूण अटक आरोपींपैकी ५ आरोपी हे विद्यार्थी आहेत. तथापि, अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सहभाग मोठा असल्याबाबतची बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) अंमली पदार्थ विरोधी कक्षातर्फे महाविद्यालयीन स्तरावर "ड्रग्ज फ्रि कॅम्पस" हा सार्वजनिक उत्सवाच्या वेळेस जनजागृती कार्यक्रम वेगवेगळया एन.जी.ओ. संस्थाच्यावतीने व्यसनाधीन इसमांवर/मुलांवर उपचार, तसेच २६ जून हा अंमली पदार्थ विरोधी दिन म्हणून व त्या पुढील पंधरवडा साजरा करण्यात येतो. सदर पंधरवडया दरम्यान अंमली पदार्थ व त्याचे दुष्परिणाम याबाबत विद्यार्थांना माहिती देणे, फिल्म दाखविणे, माहिती, चर्चासत्र, हॅन्डबील वाटप व भिंती पोस्टर्सचे प्रदर्शन करणे. तसेच प्रचार फेऱ्या, मॅरेथॉन, मोहल्ला कमिटी, पब्लीक मिटींग घेण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मालेगांव (जि.नाशिक) येथे पादचऱ्यांसाठी स्कायवॉक, भुयारी मार्गाची निर्मिती करणेबाबत

(४४) * ३१८७६ डॉ.अपूर्व हिरे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) शहरातील वाढलेली वाहनांची संख्या व वर्दळ यासाठी पादचाऱ्यांसाठी प्रमुख चौकांमध्ये स्कायवॉक किंवा भुयारी पादचारी मार्ग निर्माण करण्यात यावीत अशी मागणी आयुक्त, मालेगांव महानगरपालिका यांचेकडे दिनांक १८ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोसमपुल सर्कल, मालेगांव न्यायालय परिसर, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसर आणि सटाणा नाका, रावळगांव नाका, एकात्मता चौक, मालेगांव-कॅम्प याभागात वाहतुकीचे प्रमाण मोठे असल्याने रस्ते ओलांडतांना वारंवार अपघात घडत असून प्रचंड वर्दळीच्या या भागात स्कायवॉक, भुयारी मार्गाची गरज असल्याने याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) अशा प्रकारची मागणी मालेगांव महानगरपालिकेकडे प्राप्त झालेली नाही.

तथापि, मालेगाव महानगरपालिकेने प्रस्तावित केल्यानुसार, नवीन बस स्थानक परिसरातील वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत मालेगाव शहरात उड्डाणपूल उभारण्याच्या प्रकल्पास शासन निर्णय, दिनांक २३ फेब्रुवारी, २०१७ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील २७ गावांची स्वतंत्र नगरपालिका स्थापन करण्याबाबत

(४५) * ३२०८८ ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत समाविष्ट करण्यात आलेली २७ गावे महानगरपालिकेतून वगळून त्यांची स्वतंत्र नगरपालिका स्थापन करण्याबाबतचा अध्यादेश दिनांक ११ मार्च, २०१५ मध्ये प्रख्यापित करुन त्यावर नागरिकांच्या हरकती/सूचना मागवून याबाबतचा अहवाल विभागीय आयुक्त, कोकण यांनी राज्य शासनाला सादर करण्याचे मा.मुख्यमंत्री यांनी आदेशित केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा प्रकारचा कोणताही अहवाल शासनाकडे विभागीय आयुक्त, कोकण यांचेकडून गेला नसल्याचे दिनांक २२ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील २७ गावांची स्वतंत्र नगरपालिका स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (२), (३) व (४) कल्याण-डोंबिवली शहर महानगरपालिकेच्या क्षेत्रातून २७ गावे वगळून या गावांच्या क्षेत्राकरीता नगरपरिषद घटीत करण्याच्यादृष्टीने राज्य शासनाने दिनांक ०७/०९/२०१५ रोजी अधिसूचनेचा मसुदा प्रसिद्ध केला आहे.

- त्यानुषंगाने प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचनांवर सुनावणी घेऊन अहवाल सादर करण्यासाठी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना प्राधिकृत करण्यात आले आहे.
- याबाबतचा अहवाल सादर करण्याबाबत विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना विनंती करण्यात आलेली आहे. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या अहवालाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करणे शक्य होईल.

औरंगाबाद येथील नागेश्वरवाडीतील पुलाची दुरवस्था झाल्याबाबत

(४६) * ३४४११ श्री.सुभाष झांबड : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील नागेश्वरवाडीतील पुलाची दुरवस्था झाल्याने नागरिकांना धोकादायक पुलावरून प्रवास करावा लागत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर पुलासाठी निधी उपलब्ध करुन पुलाची दुरुस्तीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) औरंगाबाद येथील नागेश्वरवाडीतील पुलावरुन जाणा-या वाहनाने धडक दिल्यामुळे पुलावरील जुन्या संरक्षण कठडयांचे नुकसान झाले होते. तथापि सदर कठडयांची तात्काळ दुरुस्ती करण्यात आलेली असून रस्ता व पुल रहदारीस खुला करण्यात आलेला आहे. सदय:स्थितीत या पुलावरुन रहदारी सुरळीतपणे सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

शिवाजीनगर (जि.पुणे) बालसुधारगृहातील मुलांचे लैंगिक शोषण होत असल्याबाबत

(४७) * ३२३६० श्री.अनिल भोसले : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवाजीनगर (जि.पुणे) बालसुधारगृहातील मुलांचे गेल्या दिड वर्षांपासून लैंगिक शोषण होत असताना याबाबत करण्यात आलेल्या तक्रारीकडे पोलीस प्रशासनाने दुर्लक्ष केले असल्याची बाब माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार संबंधित आरोपी व या प्रकरणाकडे दुर्लक्ष करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.

(२) (अ) दैनिक केसरी या वर्तमान पत्रामध्ये लैंगिक शोषण संदर्भात प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने फिर्यादी नोडल अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण विभाग, पुणे यांनी बालनिरीक्षण गृह व बालगृह, शिवाजीनगर येथे मुलांचे लैंगिक शोषण संदर्भात वर्तमानपत्रातील प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने चौकशी समिती गठीत केली. समितीने केलेल्या चौकशीत पिडीत ३ मुलांना ३ बालक आरोपी हे लैंगिक कृत्य करण्यास भाग पाडत असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे ३ विधिसंघर्षग्रस्त बालका विरूध्द शिवाजी नगर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १४१/१७ भा.दं.वि.क. ३७७, ३४ पोक्सो ॲक्ट क्र. ३ (डी) सह ४, ७, ८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

३ विधी संघर्षीत बालकांना दिनांक ०६/०५/२०१७ रोजी निरीक्षणगृह शिवाजीनगर पुणे येथून ताब्यात घेऊन प्रिसायडिंग अधिकारी पंडीत जवाहरलाल नेहरू उद्योग केंद्र येरवडा, पुणे येथे न्यायालयात हजर करण्यात आले. गुन्हा तपासावर आहे.

(ब) फिर्यादी सचिव/व्यवस्थापक हे सह्याद्री आदिवासी ग्रामीण विकास प्रतिष्ठान, मंचर, संचलित अनाथ निराधार मुलांचे संगोपन केंद्र/ बालगृह पळस्टिका, ता.आंबेगांव, जि.पुणे येथे काम करीत आहेत. सदर संस्थेमध्ये दाखल १४ मुले ही जिल्हा परिविक्षा आणि अणुरक्षण संघटना संचलित मुलांचे निरीक्षण/ बालगृह पुणे येथुन आलेली आहेत. या संस्थेतील ४ मुले विक्षीप्तपणे वागत असल्याने त्यांच्याकडे चौकशी केली असता अणुरक्षण संघटना संचलित मुलांचे निरीक्षण/ बालगृह पुणे येथील कर्मचारी यांनी केलेल्या लैंगिक अत्याचार, शोषण व छळाबाबत पिडीत मुलांनी माहिती दिली. याबाबत फिर्यादी यांनी घोडेगांव पोलीस ठाणे, पुणे ग्रामीण येथे तक्रार दिल्याने सदर गुन्हा शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे वर्ग करण्यात आला. सदरचा गुन्हा शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १५४/२०१७ भा.दं.वि. कलम ३७७, ३२३, ५०६ पॉक्सो ४, ५ (एल) (एम) ६, १२, १७ अन्वये दाखल करण्यात आला. सदर गुन्ह्यामध्ये ९ आरोपींपैकी ७ आरोपींना दिनांक ०४/०७/२०१७ रोजी अटक करण्यात आली असून यातील २ आरोपींना सत्रन्यायालय, शिवाजीनगर यांनी अटकपूर्व जामीन मंजुर केला आहे. सदर गुन्हा तपासाधिन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील असंघटीत कामगारांकरिता महामंडळ स्थापन करणेबाबत

(४८) * **३४३१५ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील असंघटीत कामगारांच्या कल्याणासाठी महामंडळाची स्थापना करण्याचे धोरण शासनाने माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान जाहीर केले होते, खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामंडळ स्थापनेबाबात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, या महामंडळाचे स्वरूप व कार्यधोरण कसे असेल,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर : (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर मंडळ स्थापनेबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरू आहे.

(३) असंघटीत कामगार सामाजिक सुरक्षा अधिनियम, २००८ आणि असंघटीत कामगार सामाजिक सुरक्षा नियम, २०१३ अन्वये नमूद तरतुदीनुसार सदर मंडळाचे स्वरूप व कार्यधोरण असेल.

(४) विलंब झालेला नाही.

घणसोली, नवी मुंबई भागात एन.एम.एम.टी. बस चालकावर रिक्षा चालकांनी जीवघेणा हल्ला केल्याबाबत

(४९) * ३१६०९ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई येथील घणसोली भागात एन.एम.एम.टी. बस चालकावर रिक्षा चालकांनी जीवघेणा हल्ला केल्याची गंभीर घटना माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन दोषी रिक्षा चालकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, मुजोर रिक्षा चालकांकडून बस चालकांवर वारंवार जीवघेणे हल्ले होण्याच्या घटना रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी तीन आरोपींविरूद्ध कोपरखैरणे पोलीस ठाणे, नवी मुंबई येथे गु.र.क्र. १८७/२०१७ भा.दं.वि. कलम ३५३, ३२५, ३२४, ३४१, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून तीनही आरोपींना अटक करण्यात आली आहे. गुन्हा तपासावर आहे.

(३) कोपरखैरणे पोलीस ठाणे हद्दीत एनएमएमटी बस चालकांवर होणारे हल्ले यासारखे गुन्हे घडू नयेत म्हणून पेट्रोलिंग ठेवण्यात आले आहे. तसेच अशा प्रकारचे गुन्हे घडल्यास तात्काळ गुन्हा दाखल करून आरोपीवर कठोर कारवाई करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई मेट्रो वन प्रा.लि. या कंपनीने होमगार्ड प्रशिक्षण केंद्र बांधून देणेबाबत

(५०) * ३४२५६ प्रा.जोगेन्द्र कवाडे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर कॉरिडोर एम.आर.टी.एस. प्रकल्पाकरिता वर्सोवा येथील होमगार्डच्या मालकीची २४ हेक्टर जागा २ वर्षाच्या तात्पुरत्या स्वरुपात मुंबई मेस्ट्रो वन प्रा.लि. या कंपनीला कास्टिंग यार्डसाठी देण्याच्या बदल्यात उक्त कंपनीही होमगार्ड प्रशिक्षण केंद्र पूर्णपणे बांधून देण्याचा करारनामा माहे डिसेंबर, २००७ मध्ये वा त्यादरम्यान झाला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कंपनीने केलेल्या करारनाम्यास ४ वेळा मुदतवाढ घेतल्यानंतर दिनांक १८ एप्रिल, २०११ रोजी मंत्रालयात अप्पर मुख्य सचिव (गृह विभाग) यांनी घेतलेल्या बैठकीत परत ६ महिने तात्पुरत्या स्वरुपात केलेल्या करारनाम्यास मुदतवाढ देऊन २ महिन्यात प्रशिक्षण केंद्राचे बांधकाम सुरु करावे अन्यथा दिनांक १६ जानेवारी, २००९ पासून व्याजाची वसुली करण्याचा निर्णय घेण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अद्याप उक्त कंपनीने प्रशिक्षण केंद्राचे बांधकाम सुरु केले नसल्याने भाड्यापोटीची ३१ कोटी ६ लाख १२ रुपयांची थकबाकी होमगार्ड प्रशासनाला दिलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी चौकशी करुन सदरहू कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच होमगार्ड प्रशासनास प्रशिक्षण केंद्र अथवा भाड्याची रक्कम कधीपर्यंत मिळणे अपेक्षित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) सदरचा करारनामा नागरी संरक्षण संचालनालय होमगार्ड आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्यात दिनांक १९/०५/२००९ रोजी करण्यात आला आहे.

(२) यासंदर्भात गृह विभाग (विशेष), महाराष्ट्र शासन यांचेकडे दिनांक १७/१०/२०११ रोजी बैठकीच्या इतिवृत्ताप्रमाणे होमगार्ड यांची जमीन वापरण्यास ०६ महिन्याची मुदत वाढ दिली असून, व्याजाची रक्कम वसुल करणेबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

(३) उक्त प्रशिक्षण केंद्राचे बांधकाम सुरु न केल्याने भाड्यापोटी उक्त कंपनीकडून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास आजमितीस सुमारे रुपये ३१,६८,४५,००६/- एवढी रक्कम येणे बाकी आहे.

(४) व (५) करारनाम्यानुसार मुंबई मेट्रो वन प्रा.लि. यांनी होमगार्ड यांच्या ताप्तुरत्या स्वरूपात वापरलेल्या जमिनीचे भाडेपट्टा रक्कमेच्या बदल्यात होमगार्डसाठी प्रशिक्षण केंद्र व प्रशासकीय इमारत बांधून देणे अपेक्षित होते. सदर करारनाम्यातील मुळ मुदत व वाढीव मुदतीमधील भाडेपट्टयाच्या रक्कमेपैकी ३.९८ कोटी एवढी रक्कम मुंबई मेट्रो वन प्रा. लि. यांच्या VGF मधून २२/१२/२०१४ रोजी वजावट करण्यात आली आहे. तसेच सदर भाडेपट्टयाच्या रक्कमेवरील व्याजासह येणाऱ्या रुपये ३१,६८,४५,००६/- एवढया रकमेची वसुली करण्याबाबत कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

उक्त करारनाम्यातील तरतूदीनुसार मुंबई मेट्रो वन प्रा.लि. ने प्रशासकिय इमारत व प्रशिक्षण केंद्राचे बांधकाम न केल्याने व करारनामा संपुष्टात आला असल्याने जमा करण्यात आलेल्या भाडेपट्टयाच्या रकमेमधून सदर प्रशासकिय इमारत व प्रशिक्षण केंद्राचे बांधकाम प्राधिकरणामार्फत करण्याचे निश्चित केले असून सदर कार्यवाही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्यास्तरावर सुरु आहे.

ठाणे पोलिसांनी आंतरराष्ट्रीय ड्रग्ज रॅकेट उघडकीस आणल्याबाबत

(५१) * ३११०३ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे पोलिसांनी २००० कोटी रुपयांचे आंतरराष्ट्रीय ड्रग्ज रॅकेट उघडकीस आणल्यानंतर या प्रकरणी हिंदी चित्रपटसृष्टीतील अभिनेत्री ममता कुलकर्णी व तिचा पती विकी गोस्वामी यांची नावे समोर आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील अंमली पदार्थाप्रकरणी विकी गोस्वामी या प्रमुख आरोपीसह अभिनेत्री ममता कुलकर्णी यांना ठाणे सत्र न्यायालयाने फरार आरोपी म्हणून घोषित केल्याचे दिनांक ६ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या दोन्ही आरोपींना भारतात आणण्यासाठी तसेच या दोन्ही आरोपींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे. सदर आरोपीतांना मा.न्यायालयाने दिनांक ८/६/२०१७ रोजी फरार घोषित केले आहे.

(३) श्री.विकी गोस्वामी व अभिनेत्री ममता कुलकर्णी यांची मालमत्ता जप्ती बाबत न्यायलयीन कार्यवाही चालु आहे. आरोपी विकी गोस्वामी हा अमेरिका देशात ड्रग्ज संदर्भात दाखल गुन्यात अटकेत असल्याची माहिती प्राप्त झाली असून, अमेरिकन ड्रग्ज इन्फरन्समेंन्ट एजन्सी यांचेशी पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. तसेच वरील आरोपीतांविरुध्द रेड कॉर्नर नोटीस जारी करण्या संदर्भात कारवाई चालु आहे. मा.न्यायालयीन कार्यवाही पूर्ण होताच आंतरराष्ट्रीय स्तरावरील गुन्हेगार हस्तांतराबाबत कार्यवाही करुन सदर आरोपीतांना भारतात आणणे करीता कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

उल्हासनगर महानगरपालिकेची पाणीपुरवठा योजना अपूर्ण असल्याबाबत

(५२) * ३३६९२ श्री.रविंद्र फाटक : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर महानगरपालिकेस जवाहरलाल नेहरू नागरी पुनर्निर्माण अभियानांतर्गत पाणीपुरवठा योजना राबविण्याकरिता सन २००९-१० मध्ये रुपये १२१ कोटी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंत्राटदाराला वाढीव दरानुसार उक्त प्रकल्पाकरिता अंदाजित रुपये २३८ कोटी उपलब्ध करून देऊनही योजना अद्याप पूर्ण झाली नसल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रकल्पांतर्गत मंजूर सर्व कामे वेळेत पूर्ण न झाल्याने शासनाने कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) केंद्र शासन पुरस्कृत जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानांतर्गत उल्हासनगर शहरात पाणी वितरण व्यवस्था सुधारण्यासाठी सन २००८ मध्ये केंद्र शासनाने रुपये १२७.६५ कोटीची योजना मंजूर केली आहे.

प्रस्तुत योजनेसाठी केंद्र, राज्य शासन व महानगरपालिका हिश्याचा रुपये १२१.२८ कोटी निधी उपलब्ध करण्यात आला आहे, हे खरे आहे.

(२)

- उल्हासनगर महानगरपालिकेने मूळ योजनेत अतिरिक्त कामाचा समावेश करुन सदर योजना सुधारित केली.
- या रुपये २५८.२५ कोटींच्या सुधारित योजनेस उल्हासनगर महानगरपालिकेने प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिली.
- योजनेतील सुधारणेमुळे समाविष्ट झालेल्या अतिरिक्त कामासाठी आवश्यक निधी महानगरपालिकेने उभारला आहे.

- सदर योजनेतील रुपये २५६.५४ कोटीची कामे झाली असून रुपये २४३.५४ कोटीची देयके अदा करण्यात आली आहेत.
- केंद्र शासनाकडून मंजूर उल्हासनगर पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेची कामे सर्वार्थाने पूर्ण झाली असून योजनेत समाविष्ट वाढीव कामे व अतिरिक्त बाबींची कामे अंतिम टप्प्यात आहेत.

(३) व (४) सदर पाणीपुरवठा प्रकल्पाच्या कामाची गुणवत्ता व त्यातून साध्य होणाऱ्या फलनिष्पत्तीची चौकशी करण्याचे आदेश सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना देण्यात आले आहेत.

चौकशीचा अहवाल प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

राज्यातील खासदार-आमदार निधीतील कामामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

(५३) * **३१२७० श्री.नारायण राणे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खासदार-आमदार निधीतील कामांबाबत बनावट चाचणी पत्र सादर केलेल्या मुंबईतील २० कंत्राटदारांविरुध्द कारवाई प्रस्तावित आहे व या कामांसाठी येणाऱ्या निधीपैकी फक्त २५ टक्के निधी कामासाठी वापरला जात असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता : (१) मुख्य अधिकारी, झोपडपट्टी सुधार मंडळाच्या प्राप्त अहवालानुसार २० कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे. या निधीतून फक्त २५ टक्के निधी कामासाठी वापरला जातो हे खरे नाही.

(२) मुख्य अधिकारी, झोपडपट्टी सुधार मंडळाच्या प्राप्त अहवालनुसार २० कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकण्याची प्रक्रिया पुर्ण झालेली असून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याकरिता सचिव, प्राधिकरण तसेच मंडळ स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

अंबरनाथ (जि.ठाणे) तालुक्यातील इन्स्टिट्यूशनल झोनबाबत

(५४) * ३२६०६ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) तालुक्यात एम.एम.आर.डी.ए. ने २१ गावांचा विकास आराखडा तयार करताना तेथे सन २०३६ पर्यंत इन्स्टिट्यूशनल झोन निर्माण करणार असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या झोनमधील अटींमुळे २० गुंठ्यांपेक्षा कमी असलेल्या जागेवर काहीच करता येणार नसल्याने अशा जागा पडून राहणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या झोनला शेतकऱ्यांचा विरोध असून त्यात बदल करण्याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) मुंबई महानगर प्रदेशाची सुधारीत प्रारुप प्रादेशिक योजना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दिनांक १९/१/२०१६ च्या सुचनेन्वये प्रसिध्द करुन त्यावर जनतेकडून हरकती/ सूचना मागविण्यात आल्या आहेत.

माथेरान पर्यावरण संवेदनशील क्षेत्र व विकसनशील क्षेत्र यामध्ये बफर असणे आवश्यक असल्याने, माथेरान पर्यावरण संवेदनशील क्षेत्र व वाहतुक जाळे (विरार ते अलिबाग मल्टी-मोडल कॉरीडोर व मध्य रेल्वे) यांच्या मध्ये कमी उंचीच्या व जास्त विस्तारांचा विकास करता येईल असा इन्स्टिट्यूशनल झोन (संस्थात्मक भूवापर) प्रस्तावित करण्यात आला आहे.

(२) प्रारुप विकास नियंत्रण नियमावली, २०१६-३६ नुसार इन्स्टिट्यूशनल झोनमध्ये वाणिज्य वापर जसे दुकाने, उपहार गृहे, बॅक इत्यादी अनुज्ञेय भूवापरांना भूखंडाचे क्षेत्रफळाची अट लागू नाही.

(३) प्रारुप प्रादेशिक योजनेच्या या इन्स्टिट्यूशनल विभागासंदर्भात जनतेकडून हरकती प्राप्त झाल्या असून, त्यावर संबंधितांना सुनावणी देण्याची कार्यवाही नियोजन समितीमार्फत सुरु आहे. सदरची प्रारुप प्रादेशिक योजना शासनास मंजूरीकरीता सादर झाल्यानंतर त्यावर उचित निर्णय घेण्याची शासनाची भूमिका आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील मालाड मालवणी ते एव्हरशाईन नगरला जोडणारा पादचारी पुल दुरुस्त करणेबाबत

(५५) * ३४५१४ ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मालाड मालवणी ते एव्हरशाईन नगरला जोडणारा एकमेव पादचारी पुल दोन वर्षापासून तुटल्याने तेथील जनतेला नाल्यातील पाण्यातून जीवघेणा प्रवास करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक नागरिकांनी व लोकप्रतिनिधीनी शासनाकडे तसेच मुंबई महानगरपालिका कार्यालय, मालाड यांच्याकडे वारंवार तक्रार करुनही अद्याप कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (२), (३) व (४) मुंबईतील मालाड-मालवणी ते एव्हरशाईन नगरला जोडणारा पादचारी पूल डिसेंबर, २०१५ मध्ये तुटला, हे खरे आहे.

सद्य:स्थितीत मालाड-मालवणी येथून एव्हरशाईन नगर येथे ये-जा करण्यासाठी २.५ ते ३ कि.मी. अंतरावरील वाहनांसाठी असलेल्या मालाड-मार्वे रस्त्यावर असलेल्या येथील पुलावरील पदपथ उपलब्ध आहे.

मालाड मालवणी ते एव्हरशाईन नगरला जोडणारा पादचारी पुल सी.आर.झेड I व II ने बाधीत होत असल्यामुळे, मा.उच्च न्यायालय व पर्यावरण विभागाची माहे मार्च, २०१७ मध्ये परवानगी प्राप्त झाल्यानंतर महानगरपालिकेमार्फत सदर पुलाचे काम माहे एप्रिल, २०१७ पासून सुरु करण्यात आले आहे.

सदर पुलाच्या दोन्ही बाजूकडील पाईल व पाईल कॅपचे काम पूर्ण करण्यात आले असून उर्वरित काम पावसाळ्यानंतर करण्यात येणार आहे.

सदर पुलाच्या कामासाठी रुपये ५.०३ कोटी इतका खर्च अपेक्षित असून, सदर खर्चाची तरतूद सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पामध्ये करण्यात आली आहे.

सदर कामाचा कंत्राट कालावधी पावसाळा सोडून १२ महिने इतका आहे.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील बी.एस.यु.पी. योजनेबाबत

(५६) * ३१३६५ श्री.जगन्नाथ शिंदे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात केंद्र आणि राज्य शासनाच्या निधीतून उभारण्यात येत असलेल्या बी.एस.यु.पी. योजनेतील लाभार्थ्यांची यादी प्रकल्पाची मुदत संपून गेल्यानंतरही निश्चित झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने १३ हजार घरांचे लक्ष निश्चित केले असताना आतापर्यंत फक्त १ हजार ५०० लाभार्थी निश्चित झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आतापर्यंत सुमारे २ हजार ५०० घरे बांधून पूर्ण झाली असून उर्वरित १००० घरांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान योजनेच्या बी.एस.यु.पी. योजनेची मुदत मार्च, २०१७ पर्यंत होती. सदर मुदत ऑक्टोबर, २०१७ पर्यंत वाढविण्यास तत्वतः मान्यता दिली आहे.

- सदर योजनेतील लाभार्थ्यांची यादी तयार करण्यासाठी बी.एस.यु.पी. प्रकल्पाचे समंत्रक मे.सुभाष पाटील ॲन्ड असोसिएटस् यांना महानगरपालिकेने दिनांक १५/१२/२००६ रोजी नियुक्त केले होते.
- त्यांनी तयार केलेल्या यादीमध्ये त्रुटी असल्याचे दिसून आल्याने त्यांची नियुक्ती दिनांक १९/०८/२०१६ रोजी रद्द करण्यात आली. सदर योजनेबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशीअंती दिनांक ०१/०४/२०१६ रोजी गुन्हा दाखल झाला असून त्याचा तपास सुरु आहे. सदर कारणांमुळे या योजनेतील लाभार्थ्यांची यादी अंतिम करण्यास विलंब होत आहे.

(२), (३) व (४) बी.एस.यु.पी. योजनेंतर्गत सुरुवातीला १३४६९ सदनिका बांधण्यास केंद्र शासनाची मंजूरी प्राप्त होती. तद्नंतर सदनिकांची संख्या कमी करुन ७२७२ सदनिका बांधण्याचे निश्चित झाले. सदर ७२७२ सदनिकांपैकी २१७७ सदनिका वितरणाकरीता प्राप्त झाल्या आहेत. सद्य:स्थितीत १४७८ पात्र लाभार्थ्यांच्या यादीस महानगरपालिकेने मंजूरी दिली आहे.

- या योजनेतील नविन लाभार्थ्यांच्या निवडीबाबत महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या लाभार्थी निवड समितीमार्फत कार्यवाही सुरु आहे.
- बी.एस.यु.पी. योजनेबाबत प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत दाखल गुन्ह्यांची सुरु असलेली चौकशी, तसेच मा.न्यायालयात दाखल झालेल्या याचिकांमुळे लाभार्थी निवडीच्या प्रक्रियेस विलंब होत आहे.

मुंबईतील पदपथांच्या दुरुस्तीबाबत

(५७) * ३१६३७ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत रस्त्यांचे काम केल्यानंतरही काही दिवसातच रस्त्यांची दूरवस्था होत असून त्याबरोबरच अपघाताला निमंत्रण देणारे पेव्हरब्लॉक यापुढे बसवू नयेत असे आदेश आयुक्त, मुंबई महापालिका यांनी दिले असतानाही मुंबईतील मोठे चौक (जंक्शन), रस्ते आणि पदपथांवर पेव्हरब्लॉक बसविले जात असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पेव्हरब्लॉक हे योग्य पध्दतीने बसविण्यात येत नसल्यामुळे पावसाळ्यात त्याठिकाणी खड्डे तयार होऊन ते नागरिकांना चालण्यास अयोग्य ठरत आहे व त्यामुळे अपघातात वाढत होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील खड्डे हे डांबरमिश्रीत खडी भरुन दुरुस्ती केली जात असून याकडे शासन दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नागरिकांच्या सुविधांसाठी योग्य पदपथ तयार करण्याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) मुंबईतील मोठे चौक (जंक्शन) व रस्ते यांची सुधारणा डांबरीकरण किंवा सिमेंट कॉंक्रिटमध्ये करण्यात येत आहे.

तथापि, डांबरीकरण करण्यासाठी आवश्यक असणारी यंत्रसामुग्री पोहोचू शकत नाही असे अरुंद रस्ते आणि पदपथांची सुधारणा पेव्हरब्लॉकचा वापर करुन करण्यात येत आहे.

(२), (३), (४) व (५) नागरिकांच्या सुविधांसाठी रस्ते व पदपथ तयार करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे :-

- पेव्हरब्लॉकचा वापर करुन तयार करण्यात आलेल्या जुन्या व खराब झालेल्या रस्त्यांचे टप्प्याटप्प्याने डांबरीकरण करण्यात येत आहे.

- पेव्हरब्लॉकच्या रस्त्यांवरील खड्डे पेव्हर ब्लॉक बसवून तातडीने बुजविण्यात येऊन रस्ता पूर्ववत करण्यात येतो.
- पेव्हरब्लॉक बसवितांना योग्य ती खबरदारी घेण्यात येते.
- डांबरी रस्त्यांवरील खड्डे डांबर मिश्रित खडी भरुन दुरुस्त केले जातात.
- पदपथ तयार करतांना महानगरपालिकेमार्फत "पेडेस्ट्रीयन फर्स्ट" धोरणाचा अवलंब करण्यात येत आहे.

मे.कंबाटा एव्हिएशन प्रा.लि., मुंबई या आस्थापनेतील कामगारांची प्रलंबित देणी अदा करण्याबाबत

(५८) * ३१३७१ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.राहुल नार्वेकर : तारांकित प्रश्न क्रमांक २७४७६ ला दिनांक ८ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विमानतळावर ग्राऊंड हॅन्डलिंगचे काम करणाऱ्या मे.कंबाटा एव्हिएशन प्रा.लि.मुंबई या कंपनीत २१०० कामगार व कर्मचारी कार्यरत असून या कामगार व कर्मचा-यांची माहे फेब्रुवारी, २०१६ पासूनची कोटयवधी रुपयांची देणी अदा करण्याची कार्यवाही कंपनीने केली नसून यासंदर्भात मा.कामगार मंत्री यांच्यास्तरावर दोन बैठका, कामगार आयुक्त यांच्यास्तरावर दोन बैठका, मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचेकडे दोन बैठका व मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक अशाप्रकारे सात बैठकांचे आयोजन करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सात बैठकांचे आयोजन केल्यानंतरही कंपनी व्यवस्थापनाने कामगारांची देणी अद्याप पूर्णपणे अदा केलेली नसून व्यवस्थापनाकडून रुपये ५० कोटी येणे बाकी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कंपनीच्या ३ हजार कर्मचाऱ्यांच्या हक्काची देणी देण्यासंदर्भात कंपनीविरुध्द मा.औद्योगिक न्यायालयाच्या आदेशानुसार जिल्हाधिकारी, मुंबई यांचेकडून कंपनीची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे काय व कोणती मालमत्ता जप्त करण्यात आली तसेच त्यातून किती रक्कम मिळण्याची शक्यता आहे,

(४) असल्यास, शासनाने दिलेल्या निर्देशानुसार केंद्रीय श्रम आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने शासनास अहवाल सादर केला आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर : (१) हे अंशत: खरे आहे.

या संदर्भात मा.सभापती, विधानपरिषद यांचेकडे दिनांक ३१/०८/२०१६, दिनांक २७/०९/२०१६ व १२/०७/२०१७ रोजी तीन बैठका, मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ९/११/२०१६ व दिनांक ११/०३/२०१७ रोजी दोन बैठका, मा.मंत्री (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २७/०७/२०१६ व दिनांक १९/०८/२०१६ दोन बैठका तसेच आयुक्त (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २५/०७/२०१६ व दिनांक १०/०८/२०१६ दोन बैठका अशा एकूण नऊ बैठका घेण्यात आल्या आहेत.

(२) हे खरे आहे.

या कंपनीचे कामकाज ऑगस्ट, २०१६ पासून बंद झाले असून कंपनी व्यवस्थापनाने कायदेशीर देणी अद्यापपर्यंत पूर्णपणे अदा केली नाहीत. अद्यापपर्यंत व्यवस्थापनाने आस्थापना बंद करीत असल्याची कायदेशीर नोटीस दिलेली नाही परिणामी कामगारांच्या वेतन व इतर देणी निश्चित करणे कठीण झालेले आहे.

(३) होय,

सदर आस्थापनेकरीता समुचित शासन हे केंद्र शासन असून विविध कामगार कायद्याचे अंमलबजावणी करण्याचे काम प्रादेशिक श्रम आयुक्त, मुंबई या कार्यालयामार्फत केले जाते.

मा.जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर या कार्यालयाकडून मे.कंबाटा एव्हीएशन प्रा.लि. यांच्या मालकीची वाहने व यंत्रे जप्त करण्यात आली असून एकूण ६२ वाहने व ३९३ यंत्रे जप्त करण्यात आली आहेत. वाहने व यंत्रांची मूल्यांकनानुसार एकूण रक्कम रुपये २३ कोटी (अंदाजे) त्यापैकी अंदाजे रुपये ६.६४ कोटी रक्कमेच्या वाहने व यंत्रांवर तारण आहे. त्यापैकी अंदाजे १५ कोटी रक्कम वसूल होण्याची शक्यता आहे. परंतु सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयात दावा दाखल असल्याने मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

मा.जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचेकडून सदरची मालमत्ता जप्त केली होती. तथापि, मुंबई उच्च न्यायालयामध्ये कंबाटा ट्रस्ट यांनी विविध पाच याचिका दाखल केल्या होत्या त्यापैकी तीन याचिका निकाली निघाल्या असून त्यामधे मा.उच्च न्यायालयाने दिनांक ०१/०२/२०१७ अन्वये दिलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात आली आहे.

(४) व (५) होय.

मा.सभापती, विधानपरिषद, महाराष्ट्र राज्य यांचेकडे झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार मा.श्रम आयुक्त (केंद्रीय) यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने दिनांक ०१/११/२०१६ रोजी अहवाल सादर केला आहे.

तसेच मा.मंत्री महोदय (कामगार), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दिलेल्या निदेशानुसार कामगारांचे थकीत वेतन मिळवून देण्यासाठी दिनांक १२/०१/२०१७ रोजी प्रादेशिक श्रम आयुक्त (केंद्रीय) यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली असून समितीच्या अद्यापपर्यंत ०६ बैठका घेण्यात आलेल्या असून कार्यवाही सुरू आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील धोकादायक इमारतींबाबत

(५९) * ३२४८४ श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील, आर्कि.अनंत गाडगीळ : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील डॉकयार्ड रोड येथील महानगरपालिकेच्या बाबू गेनू मार्केट या इमारतीला दिनांक २७ सप्टेंबर, २०१३ रोजी वा त्यासुमारास झालेल्या दुर्घटनेनंतर महानगरपालिकेने सर्वच इमारतींचे स्ट्रक्टचरल ऑडीट सक्तीचे केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेने यावर्षी पावसाळ्यापुर्वी केलेल्या सर्वेक्षणात मुंबईतील ७०५ इमारती धोकादायक व अतिधोकादायक असून त्यांचे स्ट्रक्टचरल ऑडिटही करण्यात आले असून त्यावर माहे एप्रिल, २०१७ पर्यंत कोणतीही उपाययोजना केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अतिधोकादायक इमारतींमध्ये खाजगी इमारती, महानगरपालिका, म्हाडा तसेच केंद्र व राज्य शासनाच्या अखत्यारितील अनेक इमारतींचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अतिधोकादायक इमारतीमुळे होणाऱ्या दुर्घटना रोखण्यासाठी व सदर इमारतीतील रहिवाशांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.

तथापि, मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ३५३ (ब) अन्वये, ३० वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त जुन्या इमारतींना बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्र (Structural Audit Report) सादर करणे बंधनकारक आहे.

(२) व (३) माहे एप्रिल/मे, २०१७ मधील महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेल्या सर्वेक्षणामध्ये सी-१ प्रवर्गातील अतिधोकादायक व मोडकळीस आलेल्या एकूण ६१७ इमारती आढळून आल्या आहेत.

सदर इमारतींवर मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ३५४ अन्वये महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे :-

- ११२ इमारती रिकाम्या करण्यात आलेल्या आहेत.
- ४२ प्रकरणे तांत्रिक सल्लागार समितीकडे पाठविण्यात आली आहेत.
- १४० इमारतींची जल व विद्युत जोडणी खंडीत करण्यात आली आहे.
- २११ प्रकरणांमध्ये जल व विद्युत जोडणी खंडीत करण्याबाबतची कारवाई सुरु आहे.
- ११२ इमारतींची प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत.

(४) इमारतीच्या पुनर्बांधकामाच्या कालावधीविषयी भाडेकरुंना निश्चित अशी हमी दिली जात नसल्यामुळे भाडेकरु अशा धोकादायक इमारती रिकामी करत नाहीत.

याकरीता त्यांच्या निवाऱ्याचे संरक्षण व सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ३५४ व त्यानुषंगाने कलम ४९९ मध्ये सुधारणा करुन नवीन पोटकलम ३ ते ६ दाखल करण्यात आलेली आहेत.

त्यातील तरतुदींनुसार भाडेकरुंना सोसायटी तयार करुन इमारतींची पुनर्बांधणी करणे शक्य होणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

सागरी आयुक्तालय स्थापन करण्याबाबत

(६०) * ३२९१८ श्री.प्रविण दरेकर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईला लागून असलेल्या शहरांचे व सागरी किनाऱ्याच्या सुरक्षेकरिता सागरी आयुक्तालय स्थापन करण्याचा निर्णय घेऊनही याबाबत अद्याप कोणतीही कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सागरी आयुक्तालय स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) महसुल व वन विभागाच्या दिनांक १७/०६/२०१४ च्या अधिसूचनेनुसार ठाणे जिल्ह्याचे विभाजन करुन पालघर जिल्ह्याची निर्मिती करण्यात आली आहे. त्यानुसार सदर नवनिर्मित पालघर जिल्ह्यासाठी पोलीस अधिक्षक, पालघर हे कार्यालय कार्यान्वित झालेले आहे. नवनिर्मित पालघर जिल्ह्यामध्ये वसई, पालघर, डहाणू, तलासरी, जव्हार, वाडा, मोखाडा आणि विक्रमगड या तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे नवीन सागरी पोलीस आयुक्तालय निर्माण करण्याची आवश्यकता नाही असा निर्णय घेण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई उपनगरातील महानगरपालिका वसाहतींचा पुनर्विकास करण्याबाबत

(६१) * ३३४६० ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील एल विभाग नगरभूमापन क्र.११२ कुर्ला (प.) येथे सन १९७७ पूर्वी बांधलेल्या १८० टेनामेंट या महानगरपालिका वसाहतीत इमारत दुरुस्तीवर आतापर्यंत करोडो रुपये खर्च होऊन यावर्षी देखील ४ कोटी ५६ लाख रुपयांची इमारत दुरुस्तीसाठी आर्थिक तरतूद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीवर वारंवार खर्च होत असून निधीचा अपव्यय टाळण्यासाठी सदर वसाहतीचा पुनर्विकास करण्यात यावा, अशी मागणी अनेक वर्षांपासून तेथील रहिवाशांकडून शासनाकडे करण्यात येत आहे, तसेच त्याबाबत मा.विरोधी पक्षनेते, विधानसभा यांनी दिनांक २४ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, प्रधान सचिव (२), नगरविकास विभाग, मंत्रालय व आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिका वसाहतीच्या पुनर्विकासाबाबतचे शासनाचे धोरण हे केवळ मुंबई शहरातील वसाहतींनाच लागू असल्याने मुंबई उपनगरातील महानगरपालिका वसाहतींना पुनर्विकासापासून वंचित रहावे लागत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रश्न भाग (२) व (३) च्या अनुषंगाने मुंबई शहरातील महानगरपालिका वसाहतीच्या धर्तीवर मुंबई उपनगरातील महानगरपालिका वसाहतींचा पुनर्विकास करण्याबाबत तसेच कुर्ला (प.) येथील उक्त महानगरपालिका वसाहतींच्या पुनर्विकासाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एल विभागातील सन १९७७ पूर्वी बांधलेल्या १८० टेनामेंट या महानगरपालिका इमारतीच्या दुरुस्तीसाठी सन २०१६-१७ मध्ये रुपये ४.५६ कोटी इतक्या रकमेची तरतुद करण्यात आली होती. तथापि, या कामासाठी खर्च होऊ शकला नाही ही वस्तुस्थिती आहे.

सदर कामासाठी सन २०१७-१८ मध्ये महानगरपालिकेमार्फत अर्थसंकल्पीय तरतुद करण्यात आलेली नाही.

(२) अशा प्रकारची मागणी तसेच निवेदन प्राप्त झाली आहेत, हे खरे आहे.

(३), (४) व (५) महानगरपालिकेचे भाडेकरु असलेल्या मुंबई शहरातील वसाहतींच्या पुनर्विकासाबाबतच्या तरतुदींच्या धर्तीवर, मुंबई उपनगरातील महानगरपालिकेच्या वसाहतींच्या पुनर्वसनाबाबत विकास नियंत्रण नियमावली, १९९१ मध्ये कोणतीही विशेष तरतूद नाही.

तथापि, सदर वसाहतींचा पुनर्विकास विभागीय चटईक्षेत्र निर्देशांकानुसार अनुज्ञेय आहे.

उपनगरातील वसाहतींचा पुनर्विकास करणे शक्य व्हावे म्हणून विकास नियंत्रण नियमावली २०३४ मध्ये यासाठी विनियम क्रमांक ३३(७)(अ) ही नवीन तरतूद प्रस्तावित असून, त्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

बाणेर (पुणे) येथील कचरा प्रक्रिया प्रकल्पाबाबत

(६२) * ३२३६२ श्री.अनिल भोसले : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे मधील बाणेर येथे ओल्या कचऱ्यापासून सी.एन.जी. निर्मिती करणाऱ्या प्रक्रिया प्रकल्पात दोन महिन्यात कचऱ्यामध्ये ३२ टन वाळू आणि खडीचे मिश्रण निदर्शनास आल्याने या प्रकल्पात वारंवार ब्रेकडाऊन होत असल्याची बाब माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, तद्नुसार कचऱ्यामध्ये वाळू व खडी मिश्रण करुन प्रकल्पास हानी पोहचविणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) पुणे शहरातील बाणेर येथील नोबल एक्स्चेंज कंपनीच्या प्रकल्पामध्ये ओल्या कचऱ्यापासून सी.एन.जी. निर्मिती करणाऱ्या प्रकल्पात सुमारे ३ ते ५ टन वाळू येत असल्याचे निदर्शनास आले आहे, ही वस्तुस्थिती आहे.

नोबल एक्स्चेंज कंपनीने सदर बाब दिनांक १५ मे, २०१७ रोजीच्या पत्रान्वये पुणे महानगरपालिकेच्या निदर्शनास आणली आहे.

(२) काही ठिकाणच्या घरगुती कचऱ्यातून वाळू / खडी येत असल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आले आहे.

याबाबत घंटागाडी आणि हॉटेल गाड्यांची कसून तपासणी करण्यात येत आहे. त्यानंतर पुढील योग्य ती कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

बीड जिल्हयातील बनावट नोटा प्रकरणातील आरोपीचा जिल्हा रूग्णालयात मृत्यू झाल्याबाबत

(६३) * ३४३७१ श्री.विनायकराव मेटे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हयातील बनावट नोटा प्रकरणातील न्यायालयीन कोठडीत असलेल्या आरोपीचा जिल्हा रूग्णालयात दिनांक ३० जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील आरोपीच्या शवविच्छेदन अहवालातून मृत्यूचे कारण काय निदर्शनास आले आहे, तसेच सदरील गुन्हयाचा तपास चालू आहे काय, त्यात काय निदर्शनास आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन बीड शहर येथे दिनांक ०१/०७/२०१७ रोजी आ.मृ.क्र. ०७/२०१७ सी.आर.पी.सी. कलम १७४ प्रमाणे नोंद घेण्यात आली आहे. मयताच्या शवविच्छेदन अहवालात "फुफुसावर सुज येवून रक्त पेशी तयार होण्याची प्रक्रीया थंडावल्याने मृत्यू झाला असल्याबाबत" असे तात्पुरते मत नमूद करुन मयताचा व्हीसेरा CA तपासणीसाठी औरंगाबाद येथे पाठविण्यात आला आहे.

(३) विलंब झालेला नाही.

ठाणे येथे रिक्षाचालकाने तरुणीचा विनयभंग केल्याबाबत

(६४) * ३१६१५ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील तीन हात नाका ते पोखरण रोड दरम्यान एका तरुणीवर रिक्षाचालक व त्याच्या मित्राने रिक्षातच विनयभंग करण्याच्या प्रयत्न करुन तिला धावत्या रिक्षातून फेकल्याची घटना माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणातील दोषींना अद्याप अटक करण्यात आलेली नाही तसेच त्यांच्यावर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाण्यामध्ये रिक्षा प्रवास असुरक्षित झाल्याने महिलांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झालेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त घटनेतील आरोपींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) नौपाडा पो.स्टे. येथे गु.र.नं २०३/१७ भादंविक ३०७, ३६३, ३५४ ब, ३२५, ५०६(२),३४ अन्वये सदर गुन्ह्यात २ आरोपीना दिनांक १४/६/२०१७ रोजी अटक करण्यात येऊन ते न्यायालयीन कोठडीत आहे.

महिला निर्भयपणे प्रवास करतील यादृष्टिने पोलिसांकडून रिक्षा चालकाकडून भाडे नाकारणे, जादा भाडे घेणे, उध्दटपणाचे वर्तन करणे, स्टँड सोडून भाडे घेणे या व प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून ऑटोरिक्षा/ टॅक्सी मध्ये चालकाचे सिटचे मागील बाजूस प्रवाशांना स्पष्ट दिसेल अशा प्रकारचे नाम फलक लावणेकरीता दिनांक १७/६/२०१७ रोजी अधिसूचना जारी करण्यात आलेली आहे. त्यानुसार अंमलबजावणी न करणाऱ्या चालकांच्या विरूध्द ९६६ केसेसे दाखल करण्यात आलेल्या आहेत.

तसेच, पोलिसांमार्फत रिक्षा संघटना व त्यांचे पदाधिकारी यांचे समवेत बैठक घेण्यात येऊन अपराधाची पुनरावृत्ती होणार नाही व मुजोर रिक्षा चालकांची माहिती कळविण्याचे आवाहन केलेले आहे. त्याच प्रमाणे महत्वाचे चौक/ठिकाणी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे महानगरपालिकेकडून बसविण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

चारकोप (मुंबई) येथील पर्यावरणवादी महिलेस मारहाण झाल्याबाबत

(६५) * ३४०१८ प्रा.जोगेन्द्र कवाडे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चारकोप (मुंबई) येथील साईधाम नगर येथे खारफुटींची तोड करुन झोपड्या बांधल्या जात असल्याचे पाहून विरोध करणाऱ्या पर्यावरणवादी महिला कार्यकर्तीवर झोपडपट्टी गुंडांनी लोखंडी सळीने मारहाण करुन बलात्कार केल्याची घटना माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या महिला कार्यकर्तीची तक्रार स्थानिक पोलिसांनी नोंदवून घेण्यास टाळाटाळ केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बलात्काराची तक्रार नोंदवून घेण्यास टाळाटाळ करणाऱ्या स्थानिक पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

पिडीत महिलेच्या फिर्यादीवरून चारकोप पो.स्टे. येथे गु.र.क्र. २८५/१७ कलम ३२६, ३७६, ३५४, १४१, १४३, १४७, १४८ भा.दं.वि. अन्वये ५ आरोपी विरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला असून त्यापैकी १ आरोपीस अटक करण्यात आली आहे. तो सध्या न्यायालयीन कोठडीत आहे. प्रकरण तपासाधिन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

बोगस गिरणी कामगारांना घरे देण्यात आल्याबाबत

(६६) * ३१११४ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडा आणि कामगार विभागाच्या माध्यमातून गिरणी कामगारांना देण्यात आलेली घरे कागदपत्र नसलेल्या आणि केवळ शपथपत्र दिलेल्या सुमारे १२०० बोगस गिरणी कामगारांना देण्यात आल्याची माहिती संनियंत्रण समितीकडून देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू गिरणी कामगार बोगस असल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता : (१), (२) व (३) मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार गिरणी कामगार कर्मचारी निवारा आणि कल्याणकारी संघ यांनी सन २०१२ च्या सोडतीमध्ये एकच गिरणी कामगार/ वारस सोडतीमध्ये दोन घरांसाठी यशस्वी झाल्याची तसेच एका घरासाठी यशस्वी व एकासाठी प्रतिक्षा यादीवर असल्याची तक्रार दिनांक १०/१०/२०१६ रोजीच्या पत्रान्वये संनियंत्रण समितीकडे दाखल केली होती व अशा एकूण १२२८ गिरणी कामगार/ वारस यांची यादीसुध्दा संनियंत्रण समितीपुढे सादर केली होती. सदरहू यादीतील सर्व गिरणी कामगारांची मुंबई मंडळामार्फत तपासणी करण्यात आली व सदर १२२८ गिरणी कामगारांची यादी विश्लेषणासह संनियंत्रण समिती तसेच गिरणी कामगार कर्मचारी निवारा व कल्याणकारी संघ यांना दिली असून एकही गिरणी कामगार/ वारस यांना एकापेक्षा जास्त घराचे वितरण झाल्याचे दिसून येत नाही. तसेच १२२८ गिरणी कामगार/ वारस यांच्यापैकी जे गिरणी कामगार दोनदा यशस्वी झाले आहेत किंवा एक यशस्वी व एक प्रतिक्षा यादीवर आहे अशा दुबार यशस्वी झालेल्या गिरणी कामगार/ वारस यांचा अर्ज रद्द करुन प्रतिक्षा यादीवरील गिरणी कामगार/ वारस यांना प्राधान्य क्रमांकानुसार सदनिकांच्या वितरणाची कार्यवाही करण्यात आली/ येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कशेळी-कल्हेर (ठाणे) गावात बेकायदेशीर बांधकाम सुरु असल्याबाबत

(६७) * ३१०९१ श्री.रविंद्र फाटक : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे खाडी किनाऱ्यावर कशेळी-कल्हेर गावात डेब्रिजने बुजविलेल्या पाणथळ जमिनीवर १४ नव्या इमारतींचे एम.एम.आर.डी.ए. च्या परवानगीविना बेकायदेशीर बांधकाम सुरु असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी १०० हून अधिक अनधिकृत इमारतींचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नियमबाह्य बांधकाम करणाऱ्या विकासकावर व दुर्लक्ष करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) माहे जून, २०१७ मध्ये प्रश्नाधीन बांधकामाबाबत वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत स्थळ पाहणी करण्यात आली आहे.

(२), (३) व (४) शासन निर्णय क्र.टीपीएस/१२०६/३३०/प्र.क्र.२३०/०६/नवि-१२, दिनांक १७/०३/२००७ (दिनांक१९/०४/२००७ रोजी राजपत्रात प्रसिध्द) रोजीच्या अधिसूचने अन्वये भिवंडी परिसर अधिसूचित क्षेत्रासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४०(१)(सी) अन्वये विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केली आहे. त्यामध्ये ठाणे जिल्हयातील भिवंडी तालुक्यातील मौ.कशेळी व मौ.कल्हेर या गावांचा समावेश आहे. सदर गावांमध्ये ठाणे खाडी किनाऱ्यावरील एकूण ९१ अनधिकृत बांधकामांप्रकरणी संबंधितांना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ५३(१) अन्वये नोटीस बजावल्या असून अधिनियमातील तरतुदींनुसार सदर प्रकरणी पुढील कार्यवाही सुरू आहे.

सोलापूर जिल्हयातील दोन पोलीस अधिकाऱ्यांच्या पत्नींनी आत्महत्या केल्याबाबत

(६८) * ३२६२२ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयात दिनांक १ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास एकाच दिवशी दोन पोलीस अधिका-यांच्या पत्नींनी आत्महत्या केली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार उक्त आत्महत्येस कारणीभूत असलेल्या संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर कार्यक्षेत्रातील दोन पोलीस कर्मचाऱ्यांच्या पत्नीनी दिनांक ०१/०५/२०१७ रोजी आत्महत्या केली हे खरे आहे.

(२) सदर दोन विविध प्रकरणाबाबत खालील गुन्हे दाखल आहेत.

(अ) पोलीस कर्मचाऱ्याचे पत्नीने आत्महत्या केलेबाबत जेलरोड पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.१९६/१७ भादंवि कलम ३०६, ४९८ (अ), ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर प्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचे दोषारोप पत्र न्यायालयात सादर करण्यात आले असून सदर गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(आ) पोलीस कर्मचाऱ्यांचे पत्नीने आत्महत्या केलेबाबत जेल रोड पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १९७/२०१७ भादंवि कलम ३०२, ४९८ (अ), २०१, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी १ आरोपीस न्यायालयीन कोठडी, २ आरोपींना मा.न्यायालयाने अटकपूर्व जामीन मिळाला असून उर्वरित २ आरोपी फरार आहेत. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

वडोलगाव येथील वालधुनी नदीवरील पुलाच्या निकृष्ट बांधकामाबाबत

(६९) * ३१०४० श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर शहराला लागून असलेल्या वडोलगावचा वालधुनी नदीवर असलेला जुना पुल वर्षापूर्वी कोसळला असल्याने सदरहू पूलाच्या पुनर्बांधणीसाठी २ कोटी २२ लाखांचा निधी मंजूर होवून पूलाचे बांधकाम सुरू करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू पूलाचे बांधकाम नियमबाहयरित्या ठेकेदार श्री.प्रदिप रामचंद्रानी यांना देण्यात आले असून सदरहू ठेकेदाराने आतापर्यंत केलेल्या पूलाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे व बांधकामासाठी वापरण्यात आलेले लोखंड, सिमेंट व अन्य सामुग्रीही दुय्यम व निकृष्ट दर्जाची असल्याने महानगरपालिका आयुक्तांनी सदरहू बांधकाम बंद करण्याचे तसेच झालेले सर्व बांधकाम तोडून पुन्हा नव्याने काम सुरू करावे अन्यथा ठेकेदाराला काळया यादीत टाकण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) उल्हासनगर शहरातील वडोलगांव येथील ३० ते ३२ वर्षांपूर्वी बांधलेला पादचारी पुलाचा काही भाग दिनांक २१/०९/२०१६ रोजी कोसळला आहे.

सदर पुलाच्या पुनर्बांधणीचे काम माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये सुरु करण्यात आले असून, सदर पुलाच्या बांधकामाकरिता रुपये २.२२ कोटी इतका खर्च नियोजित आहे.

(२) व (३) सदर पुलाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबतची बातमी माहे जुलै, २०१७ मध्ये वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती.

सदर पुलाच्या पुनर्बांधणीच्या कामाच्या दर्जाबाबत पत्रकार, लोकप्रतिनिधी यांच्या तक्रारीवरुन तसेच, संबंधित कंत्राटदार महानगरपालिकेकडून नियुक्त केलेल्या मे.नोबल जिओ ट्रस्ट या सल्लागाराच्या सल्ल्यानुसार काम करीत नसल्याचे महानगरपालिकेच्या निदर्शनास आल्यानंतर, पुलाच्या बांधकामाचा तपासणी अहवाल प्राप्त होईपर्यंत सदर पुलाचे काम बंद ठेवण्याच्या सूचना दिनांक २६ मे, २०१७ रोजी देण्यात आल्या आहेत.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे :-

- सदर पुलाच्या कामाचा दर्जा राखणे, निविदेतील अटी व शर्तींप्रमाणे नियमितपणे काम करण्याकरिता महानगरपालिकेमार्फत व सल्लागारामार्फत संबंधित कंत्राटदारास पत्र तसेच नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.
- तथापि, सदर पुलाच्या पिलरच्या कामाकरिता वापरण्यात येत असलेल्या कॉंक्रिट क्युबची शासकीय प्रयोगशाळेत तपासणी करुन घेतली असता, सदर पुलाच्या कामाचा दर्जा योग्य असल्याचा अहवाल प्राप्त आहे.
- सदर पुलाच्या पिलरची कोअरटेस्ट मे.एसकेजी लि. यांचेमार्फत तपासणी करण्यात आली असून, कोअरटेस्टचा अहवाल अद्यापि अप्राप्त आहे. सदर अहवाल प्राप्त होताच पुलाचे बांधकाम पुन:श्च सुरु करण्यात येणार आहे.
- उल्हासनगर हद्दीत जाण्याकरिता सदर पुलाला पर्याय म्हणून अंदाजे ७०० मी. अंतरावरील अंबरनाथ-वडोलगांव रस्त्याचा वापर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन : **उत्तमसिंग चव्हाण**
मुंबई. **सचिव,**
महाराष्ट्र विधानपरिषद

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई